पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १५६ ■ शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ Email: citynewss80@gmail.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा

# एकनाथ शिंदेंचा भाजपाला शह, ठाकरे गट गुंडाळला

## राजेश मिश्रा यांच्यासोबत शिवसेना नगरसेवकांचा शिंदेसेनेत प्रवेश

## एसबीआयचा मोठा निर्णय! एफडी चे दर बदलले!

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**नवी दिल्ली :** भारताची सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया ने सोमवार, १५ डिसेंबर २०२५ पासून लागू होणाऱ्या काही ठराविक मुदतींच्या मुदत ठेवी तसेच MCLR आणि EBLR व्याजदरांमध्ये बदल केला आहे. हे दर सर्वसामान्य ग्राहकांसह ज्येष्ठ नागरिकांसाठीही लागू असतील. ही दरकपात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मौद्रिक धोरण समितीने रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची कपात केल्यानंतर करण्यात आली आहे. ३ कोटींपेक्षा कमी रकमेच्या २ ते ३ वर्षांच्या मुदत ठेवींवरील व्याजदरात कपात करण्यात आली आहे.

## संघाच्या मुख्यालयात महायुतीच्या आमदारांचं बौद्धिक

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**नागपूर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात महायुतीच्या आमदारांचं बौद्धिक रविवारी आयोजित करण्यात आलं आहे. यासाठी महायुतीतील घटक पक्षाच्या आमदारांना निमंत्रण देण्यात आलं आहे. मागील वर्षी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंसह भाजप आणि शिवसेनेच्या आमदारांनी संघाच्या मुख्यालयात हजेरी लावली होती. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह त्यांच्या आमदार आणि नेत्यांनी 'स्मृती मंदिर' भेट टाळली होती. त्यामुळे आता यंदा अजित पवार आणि त्यांचे आमदार संघाच्या बौद्धिक वर्गाला हजेरी लावणार का? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## सक्तीच्या सेवानिवृत्तीची शिक्षकांना धास्ती!

**सोलापूर :** इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांवरील शिक्षकांना दोन वर्षांत (३१ ऑगस्ट २०२७ पूर्वी) 'टीईटी' उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. उत्तीर्ण न होणाऱ्या शिक्षकांवर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई केली जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यानुसार शिक्षकांना न्यायालयाने दिलेली मुदत संपेपर्यंत सहावेळा पात्रता परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून २०२६ या वर्षात जून आणि डिसेंबर महिन्यात 'टीईटी' घेतली जाणार आहे. दुसरीकडे, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे देखील केंद्रीय तथा राष्ट्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) घेतली जाते.

# विदर्भात गर्भपाताच्या हजारो गोळ्यांची विक्री ; कारवाई शून्य

- गर्भपाताच्या गोळ्या खरेदीत अकोल्यातील चार डॉक्टरांचा समावेश
- मनपा, जिल्हा शल्य चिकित्सकांनी चौकशी दाबली का ?
- पीसीपीएनडीटी समिती करते तरी काय जिल्हाधिकारी घेतील काय पुढाकार
- कागदोपत्री गोळ्या खरेदीचे पुरावे, डॉक्टरांनी मात्र नकार दिल्याचे चित्र

प्रतिनिधी १३ डिसेंबर




**अकोला :** जिल्ह्यात गर्भपाताच्या गोळ्यांची सर्रास विक्री होत असून त्यावर कुणाचे ही नियंत्रण नाही. इतकेच काय तर पीसीपीएनडीटी समितीची या सर्व प्रकरणातील भुमिका संशयास्पद आहे. जिल्ह्यातील चार डॉक्टरांनी गर्भपाताच्या गोळ्या खरेदीचे प्रकरणात डॉक्टरांच्या मागणीपत्रावर गर्भपाताच्या गोळ्यांचा पुरवठा झाला असून त्यांच्या द्वारे चेकद्वारे पैसे देत त्या खरेदी केल्याचा अहवाल असताना त्या डॉक्टरांनी गर्भपाताच्या गोळ्या वापरल्या कुठे आणि त्याने किती महिलांचा गर्भपात केला. त्या पैकी किती कन्या भ्रुण होते याची तपासणी होण्याची गरज आहे.पण, हे प्रकरण दाबण्यात जिल्हा शल्यचिकित्सक व महापालिका आरोग्य विभाग अग्रेसर असून या प्रकरणाची सखोल चौकशीचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी देण्याची गरज आहे. इतकेच नाही तर गर्भपाताच्या गोळ्यांची खरेदी करुन डॉक्टरांनी सुरु केलेल्या या नव्या व्यवसायांवर धाडी टाकण्याची गरज असून त्यांचा बुरखा टरटर फाडण्याची गरज आहे. अकोल्यातील चार डॉक्टरांनी गर्भपाताच्या गोळ्या विकत घेतल्याचे कागदोपत्री पुरावे असताना त्यांनी कुठल्या आधारावर गर्भपाताच्या गोळ्या विकत घेतल्या नाहीत असे चौकशी समितीला कळविले याची चौकशी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अन्न व औषध प्रशासन , अकोला यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, सर्वोपचार रुग्णालय, अकोला यांना पत्र पाठवूनगर्भपातावरील औषधाच्या गैरवापर प्रकरणाच्या चौकशी अहवालाबाबत पुढील कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.पण, त्यांनी या प्रकरणात डॉक्टराचा बचाव करण्याचा सुरु केलेला प्रयत्न अनाकलनीय आहे.

वाशिम जिल्ह्यातील रिसोड येथे अवैध गर्भपात अकोल्यातील पिल कॉलनी येथील मे. श्रीनिवास फार्मा या पेढीने अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यांतील वैद्यकीय व्यावसायिकांना या औषधाची विक्री केल्याचे आढळून आले आहे. इतकेच नाही तर त्यांनी डॉक्टरांना देखील या गोळ्या विकल्या. या गोळ्या डॉक्टरांनी कशासाठी विकत घेतल्या हा प्रश्न आहे. त्याच बरोबर डॉक्टरांनी फार्मासिस्टची भूमिका कशी स्विकारली याचा शोध घेण्याची गरज आहे. गर्भपाताच्या ज्या गोळ्या डॉक्टरांनी विकत घेतल्या त्याचा वापर कुठे, कसा, कुणासाठी आणि कुठल्या गर्भसाठी केला. याचा खुलासा होण्याची गरज आहे. वारंवार स्त्री भ्रुण हत्येच्या बातम्या समोर येत असताना अशा प्रकारे डॉक्टरांनी गर्भपाताच्या गोळ्यांची खरेदी का केली. गोळ्या खरेदी केल्यानंतर त्या खरेदी न केल्याचा खोटा दावा का केला याचा शोध घेण्याची गरज आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात नुसती चौकशी नाही तर संबंधितांवर पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### डॉक्टरांचा चौकशी समिती समोर खुलासा

- डॉक्टरांनी अशा प्रकारचा खुलासा चौकशी समितीला केला
- डॉ. मुकेश राठीः मागील ३ वर्षांपासून औषधाचा वापर केला नाही.
- डॉ. कविता राठीः मागील १२ वर्षांपासून औषधाचा वापर केला नाही.
- डॉ. निथीका रघुवंशीः १० वर्षांपूर्वी गर्भपात केंद्राची नोंदणी केली होती, परंतु सध्या वैद्यकीय व्यवसाय करत नाही.
- डॉ. वर्षा बडगुजरः आजपर्यंत त्यांनी औषधाचा वापर केला नाही.

### तपासणीत झालेला खुलासा

पिल कॉलनीतील मे. श्रीनिवास फार्मा या पेढीच्या तपासणीत डॉक्टरांनी गर्भपाताच्या गोळया खरेदी केल्याचे स्पष्ट झाले आहे. श्रीनिवास फार्मा या पेढीने डॉक्टरांनी मागणी केल्यानंतर डॉक्टरांची सही असलेली विक्री बिले, आणि औषधाची रक्कम पेढीस अदा केल्याचा पुरावा सादर केला आहे. त्यात डॉ. मुकेश राठी, डॉ. कविता राठी,डॉ. नीतिका रघुवंशी (रघुवंशी हॉस्पिटल) यांच्या हॉस्पिटलकडून,डॉ. वर्षा बडगुजर (बडगुजर नर्सिंग होम) यांनी खरेदी केल्याचा अहवाल अन्न व औषध विभागाने दिला आहे. या सर्व पुराव्यांवरून वर नमूद डॉक्टरांनी गर्भपातासाठी उपयुक्त औषधे खरेदी केल्याचे स्पष्ट होते. सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, अकोला यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांना विनंती केली आहे की, पुराव्यांच्या आधारावर उपरोक्त डॉक्टरांची पुनः चौकशी करावी. तसेच, सदर चौकशीत एफ डी ए कार्यालयाचे औषध निरीक्षक यांचा सहभाग निश्चित करावा, जेणेकरून प्रकरणास अंतिम स्वरूप देता येईल. विशेष म्हणजे, या डॉक्टरांनी जिल्हास्तरीय पथकासमोर 'औषधाचा वापर केलेला नाही' असा दावा केला होता. मात्र एफ डी ए तपासणीत खरेदीची बिले, डिमांड नोट्स आणि पैशांच्या व्यवहाराचे पुरावे समोर आले आहेत.

- शिवसेनेचा भाजप सोबत संघर्ष वाढणार का
- शिंदेसेनेचे वरिष्ठ पक्ष प्रवेशाच्या वेळी अनुपस्थित

प्रतिनिधी १३ डिसेंबर



**अकोला :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उध्दव ठाकरे गटाचे शिवसेना शहर प्रमुख राजेश मिश्रा आणि इतर पाच माजी नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला. राजेश मिश्रा यांच्या पक्ष प्रवेशावेळी शिवसेनेचे इतर पदाधिकाऱ्यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय असून भाजपने कट्टर हिंदूत्वाचा चेहरा गळाला का लावला नाही. अशी विचारणा आता होत आहे. उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे, गृहराज्यमंत्री योगेश कदम आणि आ. मनिषाताई कायंदे यांच्या उपस्थितीत राजेश मिश्रा आणि त्यांच्या साथीदाराचा हा पक्ष सोहळा नागपूर येथे पार पडला.

शुक्रवार रात्री उध्दव ठाकरे गटाचे शहर प्रमुख राजेश मिश्रा यांनी त्यांच्यासोबत पाच माजी नगरसेवकांचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. हा प्रवेश म्हणजे राजेश मिश्रा आणि त्यांच्या साथीदारांना धनुष्यबाण उपलब्ध करणारा ठरला आहे. इतकेच नाही तर या धनुष्यबाण निशाणीसह मोठी शिदोरी शिंदे सेनेच्या माध्यमातून मिळणार आहे. विधानसभा निवडणुकीत भाजप उमेदवार विजय अग्रवाल यांना राजेश मिश्रा यांनी शह दिला होता. ही ओली जखम मिश्रा यांच्या शिंदे सेनेतील प्रवेशाने बरी होते काय, हे पाहण्यासारखे असेल. विधानसभेची ती जखम जर चिघळली तर अकोल्यात भाजप महापालिका निवडणुक महायुतीच्या बॅनरखाली लढणे शक्य नाही. राजेश मिश्रा या कट्टर हिंदूत्वाच्या चेहऱ्याला भाजपाने नाकारले की त्यांनी त्यासाठी प्रयत्न केले नाही असा ही मुद्दा राजकीय पातळीवर उपस्थित होत आहे. राजेश मिश्रा यांच्या सारखा कट्टर शिवसैनिक भाजपमध्ये आला असता तर मोठा हिंदूत्वाचा जनाधार भाजपच्या पाठिशी राहिला असता. पण, भाजप अंतर्गत घडामोडींनी ही संधी दिली नसल्याची माहिती. राजेश मिश्रा यांनी शिंदे सेनेत प्रवेश केल्याने उध्दव ठाकरे गटाची शिवसेना कमजोर झाली आहे.

उध्दव ठाकरे गटाने राजेश मिश्रा यांना थांबविण्यास केलेली काटसर समोर आली आहे. राजेश मिश्रा शिंदे सेनेत जाणे हे उध्दव ठाकरे गटाचे मोठे अपयश अधोरेखित करत आहे. महापालिका निवडणुकीपुर्वी राजेश मिश्रा यांनी शिंदे सेनेत मारलेली उडी त्यांना राजकीय दृष्टया तारुन नेणारी ठरणार आहे. इतकेच नाही तर मिश्रा आणि अग्रवाल यांच्यातील मतभेद या निमित्त दूर होतात की वाढतात हे पाहण्यासारखे असेल. राजेश मिश्रा यांनी अकोल्यातील शिंदे सेनेच्या मोठ्या नेत्याला सोबत न घेता केलेला पक्ष प्रवेश हा अनेकांच्या जिव्हारी लागण्याची शक्यता आहे. मिश्रा यांच्या प्रवेशाबरोबर महानगर प्रमुखपदाची शिंदे सेनेकडून झालेली घोषणा शिंदे सेनेतील इतरांसाठी पोटदूखी ठरु शकते. एकूण राजेश मिश्रा यांच्यासह झालेल्या माजी नगरसेवक प्रवेशाने शिंदे सेनेने मोठा निशाणा भाजप, उध्दव ठाकरे यांची शिवसेना यांच्यावर लगावला आहे. एकूणच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या धनुष्यबाणातून अनेक तीर निघाले असून भाजपसाठी हा शह आहे तर उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी डोकेदूखी ठरणार आहे.

### अकोला पश्चिम मध्ये ठाकरे गटाकडे कोणीच नाही

- उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडे अकोला पश्चिम मध्ये राजेश कृपाशंकर मिश्रा (शिवसेना शहरप्रमुख तथा गट नेते मनपा अकोला), अनिताताई राजेश मिश्रा (माजी नगरसेविका),गायत्रीदेवी कृपाशंकर मिश्रा (माजी नगरसेविका),गजानन उत्तमराव चव्हाण ( माजी नगरसेवक),प्रमिलाताई पुंडलिकराव गीते ( माजी नगरसेविका), राजकुमारी राजकुमार मिश्रा (माजी नगरसेविका),तरुण जगदीश बगेरे (उपजिल्हा प्रमुख),नितीन रमाशंकर मिश्रा (युवा सेना शहर प्रमुख),,संजय रतनलाल अग्रवाल ( उपशहर प्रमुख ),अंकुश शिंत्रे ( उपशहर प्रमुख),रुपेश ढोरे (विभाग प्रमुख),राजेश इंगळे (विभाग प्रमुख),मुन्ना भाऊ उकर्डे (विभाग प्रमुख),श्याम भाऊ रेळे (विभाग प्रमुख),चेतन राजेंद्र मारवाल (सोशल मीडिया समन्वयक),योगेश पुंडलीकराव गीते (प्रसिद्धी प्रमुख) यांच्यासह शेकडो शिवसैनिकांनी राजेश मिश्रा यांच्या नेतृत्वात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत शुक्रवारी रात्री प्रवेश केला. या प्रवेशानंतर राजेश मिश्रा यांना महानगर प्रमुख पदाची जबाबदारी तात्काळ देण्यात आली हे विशेष.

# पोलीस ठाण्याचे पीआय एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळमधून या क्षणाची सर्वात मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे. अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नरेश रणधीर यांना आज लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे.१ लाख रुपयांची लाच स्वीकारताना त्यांना त्यांच्याच दालनात ताब्यात घेण्यात आले.

यवतमाळ येथील अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नरेश रणधीर यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई केली आहे. एका तक्रारदाराच्या मित्राला त्याने उसनवारीने दिलेले १० लाख रुपये परत मिळवून देण्यासाठी पीआय रणधीर यांनी लाचेची मागणी केली होती. सुरुवातीला ५ लाख आणि नंतर ३ लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती.मात्र, आज दुपारी तक्रारदाराकडून १ लाख रुपये लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने त्यांना त्यांच्याच दालनात सापळा रचून रंगेहाथ पकडले. अमरावती एसीबीचे पोलीस अधीक्षक बापू बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चित्रा मेसरे यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली आहे. या घटनेमुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

# अकोल्याच्या चार पत्रकारांना पाच दिवस कारावासाची शिक्षा

प्रतिनिधी १३ डिसेंबर

### विशेषाधिकार हक्क भंग प्रकरणी

**नागपुर :** आमदार अमोल मिटकरी यांनी दाखल केलेल्या विशेषाधिकार हक्क भंग प्रकरणी अकोल्याच्या इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या चार पत्रकारांना विधान परिषद सभापती यांनी पांच दिवसाची कारावासाची शिक्षा दिली आहे. यू ट्यूब पत्रकार गणेश सोनोने, हर्षदा सोनोने, अंकुश गावंडे व अमोल नांदूरकर् यांना सभापती यांनी पांच दिवसाची शिक्षा सुनावली आहे. तर यु ट्यूब चॅनेल सत्य लढाचे संपादक सतीश देशमुख यांनी या प्रकरणात माफी मागितल्या मुळे त्यांना सभापतींनी माफ केले आहे. पत्रकारावर केलेल्या कारवाईचा अकोला जिल्हा पत्रकार संघातर्फे निषेध व्यक्त केला आहे.

# निवडणुकीची चाहूल लागताच सर्व माजी नगरसेवक सक्रिय

प्रतिनिधी १३ डिसेंबर

### प्रभागात फिरून घेत आहेत समस्यांचा आढावा, बैठका सुरु

**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीसाठी पुढील आठवड्याच्या सुरुवातीलाच आदर्श आचारसंहिता लागू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत, ज्यांच्या भेटीसाठी लोकांना फेऱ्या माराव्या लागत होत्या, तेच इच्छुक उमेदवार आता दररोज वॉर्डमध्ये फिरताना दिसत आहेत.

महापालिका निवडणुकीची धामधूम वाढताच, नगरसेवक बनण्यास इच्छुक असलेले उमेदवार सक्रिय झाले आहेत. पूर्वी ज्या माजी नगरसेवकांना भेटणे कठीण होते, आता तेच माजी नगरसेवक आगामी निवडणुकीत नगरसेवक पदाचे उमेदवार आहेत. ज्यांना भेटणे दूरची गोष्ट, त्यांचे दर्शनही दुर्लभ झाले होते, तेच इच्छुक उमेदवार आता आपापल्या जुन्या प्रभागांमध्ये फिरून जनतेच्या समस्यांचा आढावा घेण्याचे काम करत आहेत. कदाचित आता त्यांना आठवण झाली असावी की 'जनता' देखील काहीतरी असते.लवकरच महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू होणे निश्चित मानले जात आहे. याच पार्श्वभूमीवर नगरसेवक पदाचे इच्छुक उमेदवार आपापल्या प्रभागांमध्ये फिरताना दिसत आहेत. आता त्यांना खुर्चीच्या चिंतेमुळे जनतेच्या समस्यांची आठवण येत आहे.अकोला शहरातील सर्व नागरिकांची अशी मागणी आहे. की, आपल्या प्रभागांचे नेतृत्व अशा योग्य उमेदवाराच्या हाती द्यावे, जो स्वच्छ, पारदर्शक आणि जबाबदार असेल.शहरातील वाढती घाण, रस्त्यांची दुरवस्था, जलनिःसारण, पथदिवे, पाणीटंचाईच्या समस्यांसारखे मुद्दे दरवेळेप्रमाणे या निवडणुकीच्या प्रचारातही केंद्रस्थानी राहतील.

# भाजपकडून 16 बंडखोर सहा वर्षांसाठी निलंबित

### जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांचा निर्णय

प्रतिनिधी १३ डिसेंबर



**वाशिम :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षशिस्त मोडत अधिकृत उमेदवारांविरुद्ध उमेदवारी दाखल करणाऱ्या १६ बंडखोरांवर भारतीय जनता पक्षाने कठोर कारवाई केली आहे. १२ डिसेंबर रोजी भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी या सर्वांना पुढील सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्याचा निर्णय जाहीर केला. निलंबित सदस्यांमध्ये जिल्हा चिटणीस करूणा कल्ले, महिला मोर्चा जिल्हा महामंत्री छाया पवार, माजी नगरसेवक प्रभाकर काळे, माजी युवा मोर्चा अध्यक्ष वैभव उलेमाले, सदस्य राजेश विश्वकर्मा, आशा खटके, गजानन ठेंगडे, माजी जिल्हा उपाध्यक्ष धनंजय हेंद्रे, वाशिम शहर उपाध्यक्ष संगिता पिंजरकर, मदन राठी, मुकेश चौधरी, अनंत रंगभाळ, उत्तर आघाडी प्रकोष्ठांचे सावंतसिंग ठाकूर, 'बेटी बचाओ बेटी पढ़ाओ' सेलचे प्रमुख सचिन पेंढारकर, महिला शहर उपाध्यक्ष अनिता इंगोले आणि गजू लांडगे यांचा समावेश आहे. पक्षशिस्त भंग करणाऱ्यांबाबत कोणतीही सहानुभूती न दाखवण्याचा निर्धार पक्षाने स्पष्ट केला आहे. दरम्यान, पक्षातील कुठल्याही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्याने पक्षविरोधी भूमिका घेतल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असे सुतोवाच जिल्हाध्यक्षांनी केले.

# नाफेड खरेदी केंद्रावर बनावट ग्रेडरचा प्रकार उघड

प्रतिनिधी १३ डिसेंबर

### पैशांची मागणी करताना व्हिडिओ व्हायरल



**अकोट:** अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीत किमान आधारभूत किमतीवर सुरू असलेल्या नाफेडच्या सोयाबीन खरेदीत ९ डिसेंबर रोजी गंभीर प्रकार उघडकीस आला. खरेदी केंद्रावर कार्यरत असलेला आरूष पटेल नामक ग्रेडर अधिकृत नसल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. वाहन खाली करण्यासाठी ५ हजार रुपयांची मागणी केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शेतकरी आक्रमक झाले असून, यावेळी संबंधित ग्रेडरला मारहाण झाल्याची माहिती आहे.

ग्रेडिंगदरम्यान नाहक कारणे देत गाड्या रद्द केल्या जात असल्याने शेतकऱ्यांत असंतोष खदखदत होता. यापूर्वीही अशाच प्रकारामुळे दोन दिवस खरेदी बंद ठेवण्यात आली होती. पुन्हा एकदा प्रकार घडल्याने नाफेडची खरेदी ठप्प झाली. दरम्यान, राष्ट्रवादी (शरद पवार गट) युवक जिल्हाध्यक्ष राम म्हैसने यांच्या नातेवाईकांकडूनही पैशांची मागणी झाल्याचा आरोप आहे. याप्रकरणी म्हैसने यांनी वरिष्ठांकडे तक्रार दाखल करून दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणाला नवे वळण देत ११ डिसेंबर रोजी एनसीएमएल कंपनीचे महाराष्ट्र हेड कपिल देव्यास अकोट येथे आले असता, 'आरूष पटेल नावाचा कोणताही ग्रेडर आमच्या कंपनीत कार्यरत नाही,' असा दावा त्यांनी केला. मात्र, अकोट खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष हिदायत पटेल यांनी जिल्हा प्रतिनिधींनी आयकार्ड व नियुक्तीपत्र दाखवून संबंधिताची नियुक्ती केल्याचे सांगितले. त्यामुळे नेमका खरा कोण, याबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. या प्रकारामुळे आतापर्यंत झालेल्या खरेदीच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील कारवाईकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

> आरूष पटेल आमच्या कंपनीत ग्रेडर नाही. प्रकरणाचा शोध घेऊन पोलीस कारवाई करू.
>
> **– कपिल देव्यास,** महाराष्ट्र हेड, एनसीएमएल

> जिल्हा प्रतिनिधींनी नियुक्तीचे कागद दाखविले होते. त्यामुळे तो ग्रेडर होता. देव्यास खरेच महाराष्ट्र हेड आहेत का, याची माहिती नाही.
>
> **– हिदायत पटेल,** अध्यक्ष, खरेदी-विक्री संघ, अकोट

# मंजूर कामांना मंजुरी मिळूनही सुरूवात नाही

### ग्रामस्थ जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अकोला :** अकोल्याच्या उगवा फाटा–आगर रोड, डाबकी रोड रेल्वे गेट अमानतपुर मार्ग तसेच चिचखेडा नाला व मळखंड पुलाच्या कामांना मंजुरी मिळून आठ महिने उलटले तरी काम सुरू न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. खराब रस्त्यांमुळे अपघात वाढले, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. दहा ते पंधरा गावांची वाहतूक विस्कळीत झाली आहे. सगळ्यात गंभीर बाब म्हणजे काम ठप्प राहिल्याबाबत काही लोकप्रतिनिधींकडून अडथळे येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासकीय निष्काळजीपणाचा मुद्दा उपस्थित करत ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. तातडीने काम सुरू करण्याची मागणी केली. त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सोमवारी वर्क ऑर्डर काढण्याचे आश्वासन दिले. अन्यथा सोमवारपासून रास्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.अकोल्याच्या उगवा फाटा–आगर रोड, डाबकी रोड रेल्वे गेट अमानतपुर मार्ग तसेच चिचखेडा नाला व मळखंड पुलाच्या कामांचा समावेश आहे.

## शहरात कलम ३७(१) व(३) लागू

**अमरावती :** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस आयुक्त (अमरावती शहर) यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. सदर प्रतिबंधात्मक आदेश शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून दि. १३ डिसेंबर २०२५ ते २७ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अरविंद चावरिया पोलीस आयुक्त अमरावती यांनी कळविले आहे.

# शिवाजी शिक्षण संस्था करणार मुख्यमंत्र्यांचा सत्कार

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार'**
**श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांची पत्रकार परिषदेत घोषणा**

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अमरावती :** श्री. शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिल्या जाणारा या वर्षीचा 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार २०२५' महाराष्ट्राचे मुख्यमंत्री.ना.देवेन्द्रजी फडणवीस यांना त्यांच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कार्यासाठी देण्यात येणार आहे. रु.पाच लक्ष रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या दि.२७डिसेंबर २०२५ ला आयोजित १२७व्या जयंती उत्सवाच्या मुख्य समारंभात या पुरस्काराने मा.मुख्यमंत्र्यांना सन्मानित करण्यात येणार असून त्यांनी या समारंभाला उपस्थित राहून पुरस्कार स्वीकारण्याचे मान्य केले आहे, अशी माहिती श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी दिली.

श्री. शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात जयंती उत्सवाचा मुख्य समारंभ होणार असून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे, शालेय शिक्षण राज्यमंत्री मा.ना.पंकज भोयर, राज्यसभा सदस्य .खासदार डॉ.अनिल बोंडे, अमरावतीचे खासदार .बळवंत वानखडे, आमदार .सुलभा खोडके, विधान परिषद सदस्य आमदार.संजय खोडके, आमदार .प्रताप अडसड, आमदार.रणधीर सावरकर या सोहळ्याला प्रामुख्याने उपस्थित राहतील, असेही त्यांनी सांगितले.

जयंती उत्सवाच्या मुख्य समारंभात मा.खासदार शरदचंद्र पवार साहेबांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील उत्कृष्ट शेतकरी महिलेला 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार २०२५' आणि केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील पुरुष शेतकऱ्याला 'स्व.शरद जोशी उत्कृष्ट पुरुष शेतकरी पुरस्कार' हे दोन पुरस्कार



देखील वितरीत करण्यात येतील. रोख रु.१,११,१११/-(रुपये एक लक्ष अकरा हजार एकशे अकरा), स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे या दोन्ही पुरस्काराचे स्वरूप आहे. निवड समितीतर्फे लवकरच या दोन्ही कृषी पुरस्कार विजेत्यांची घोषणा करण्यात येईल.

श्रीमती विमलाबाई देशमुख (वैद्यकीय शिक्षण) अभ्यासवृत्ती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले (कृषी शिक्षण) अभ्यासवृत्ती आणि कस्तुरबा कन्या शाळेतील १० वर्गातील खेळाडू विद्यार्थिनी कु. भक्ती गजानन चौधरी हिला क्रीडाक्षेत्रातील उल्लेखनीय प्राविण्याबद्धल ' डॉ.पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्कार' देखील या सोहळ्यात प्रदान करण्यात येतील,असे त्यांनी सांगितले.

शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा जयंती उत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येत आहे.डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने दि.१८ ते २७ डिसेंबर २५ पर्यंत नि:शुल्क कृत्रिम अंगारोपण 'जयपूर फुट' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरासाठी आतापर्यंत ६०० गरजूंनी नोंदणी केली असून या शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयात दि.२५ डिसेंबरला 'आंबा परिषद २०२५' आयोजित करण्यात आली आहे.या आंबा परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्राचे कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार असून डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.आंबा लागवडीचे विदर्भ परिसरातील क्षेत्र वाढविणे, हा या परिषदेचा उद्देश आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेची पहिली शाळा श्री शिवाजी हायस्कूल मेन ब्रँच, अमरावतीचा यावर्षी शताब्दी महोत्सव असून या महोत्सवाचे उद्घाटन २२ डिसेंबरला सकाळी ११ वाजता होत आहे.या महोत्सवाला आमदार सौ.सुलभाताई खोडके, आमदार श्री.संजय खोडके, माजी आमदार प्रा.बी.टी.देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून श्री.महेश पालकर, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक, पुणे यांचे हस्ते उदघाटन होईल.या समारंभात महानगर विज्ञान प्रदर्शनीचे देखील उद्घाटन करण्यात येईल. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आली आहे.श्रीमती विमलाबाई देशमुख सभागृहात आयोजित या व्याख्यानमालेत २३ डिसेंबरला अर्थ विचारतज्ञ श्री.जयदीप हर्डीकर, नागपूर, दि.२४ डिसेंबरला श्री. अविनाश पाटील,संचालक, विवेकनामा फाउंडेशन,धुळे आणि दि.२५ डिसेंबरला भाषातज्ञ डॉ.दीपक पवार, मुंबई यांचे व्याख्यान होईल.

## मोर्शी खुले कारागृहात मानवी हक्काबाबत मार्गदर्शन

प्रतिनिधी १३ डिसेंबर



**अमरावती :** मोर्शी येथील खुले कारागृहात बंद्यांसाठी मानवी हक्क आणि संरक्षण या विषयावर कायदेविषयक जागृती कार्यक्रम बुधवार, दि. १० डिसेंबर रोजी पार पडला.

राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि राज्य मानवी हक्क आयोग, कारागृह विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवसानिमित्त मानवी हक्क आणि संरक्षण या विषयावर कायदेविषयक जागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी व्ही. बी. वानखडे, एस. व्ही. खांडेकर, डी. एस. वमने, कारागृह अधीक्षक एस. एस. हिरेकर उपस्थित होते. न्यायरक्षक कार्यालयाचे ॲड. अमित सहारकर यांनी बंद्यांचे कारागृहातील हक्क व कर्तव्ये याविषयी माहिती दिली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डी. एस. वमने यांनी कारागृहातील बंद्यांना जगण्याचा अधिकार, पिण्याचे पाणी व जेवणाचा अधिकार, जीविताची सुरक्षा, कायदेविषयक मदत, मनोरंजन, शिक्षण, आरोग्याचा अधिकार असल्याचे सांगितले. ॲड. अंकुश इंगळे यांनी प्रास्ताविक केले. कारागृहाचे कृषी पर्यवेक्षक एन. व्ही.पकडे यांनी सूत्रसंचालन केले. कारागृह अधीक्षक एस. एस. हिरेकर यांनी आभार मानले.

## जिल्ह्याच्या विकासासाठी सहकार्य करणार –पालक सचिव आय.ए.कुंदन

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अमरावती** : जिल्ह्यातील महापालिका, जिल्हा परिषद आणि जिल्हा प्रशासनाशी चर्चा करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून महत्वाचे विषय मार्गी लावण्यासाठी मंत्रालयस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल. यात जिल्ह्याच्या विकासासाठी सहकार्य करणार असल्याची माहिती पालक सचिव आय. ए. कुंदनन यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात श्रीमती कुंदन यांनी बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड आदी उपस्थित होते.

सुरवातीला जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी जिल्ह्यातील पीएम मित्रा पार्क, चिखलदरा येथील स्कायवॉक, मेळघाटातील २५ गावाचा विजेचा प्रश्न, ईको टुरीझम आणि मेळाघाटातील आरोग्य, दळणवळण, विजेच्या प्रश्नाबाबत माहिती दिली. प्रामुख्याने मेळघाटातील पायाभूत सुविधांसाठी राज्य वन्यजीव मंडळाची बैठक घेऊन जिल्ह्यातील विकासकामांना आवश्यक असलेल्या परवागीसाठी केंद्रीय वन्यजीव मंडळाकडे पाठविण्याची विनंती केली. तसेच ईको टुरीझमसाठी आवश्यक असणारा ५० कोटी रूपयांचा निधी देण्यात यावा. जिल्ह्यात उद्योगाचे वातावरण होण्यासाठी मोठा उद्योग येण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हा परिषदेत प्रामुख्याने वैद्यकीय पदांची भरती शासनस्तरावरून करण्यात यावी. यामुळे वैद्यकीय सुविधा सुधारण्यास मदत मिळेल. महापालिकेतील प्रारूप विकास आराखड्याला मंजुरी मिळावी. दुकाने व गाळ्यांची लिजची मुदत २०१८मध्ये संपली असल्याने याबाबत शासनाची तातडीने परवागनी मिळावी, यासाठी सहकार्य आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी औद्योगिक सुरक्षा मंडळाचा आढावा घेण्यात आला.

## स्वाधार योजनेतील त्रृटी पूर्ण करण्यासाठी 19 डिसेंबरपर्यंत मुदत

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अमरावती** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रांतील त्रुटींमुळे कार्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी १९ डिसेंबरपर्यंत त्रृटी पूर्ण कराव्यात असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे.

राज्य शासनाने शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता ११वी, १२वी तसेच १२वी नंतरच्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरू केली आहे. सन २०२३-२४ व २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, त्यांच्यापैकी काही अर्ज कागदपत्रांतील कमतरतेमुळे कार्यालयात प्रलंबित आहेत. या प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे.

कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देऊनही अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रुटी पूर्तता केलेली नाही, ज्यामुळे त्यांचे अर्ज प्रलंबित आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे कार्यालयात संबंधित शाखेकडे जमा करावीत. या मुदतीत त्रुटी पूर्ण न केल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी, विद्यार्थ्यांची राहील. याबाबत अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालयाशी किंवा दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१२६१ वर संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण, सहायक आयुक्त आर. व्ही. जाधवर यांनी केले आहे.

## आ.रवी राणा यांच्या प्रयत्नातून ७७ अतिक्रमण धारकांना नियमित लीज पट्टयाचे सुनील राणा यांच्या हस्ते वाटप

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अमरावती:** गेल्या अनेक वर्षापासुन बडनेरा जुनी वस्ती, चमन नगर परिसरात अनेक नागरिकांनी अतिक्रमण करुन घरांचे बांधकाम करण्यात आले होते. त्यामुळे त्या भागातुन जाणाऱ्या अकोली वळण रस्त्याचे काम रखडल्याने रहदारीच्या रस्त्यामध्ये खोळंबा निर्माण झाला होता. त्यामुळे आमदार रवि राणा यांनी विशेष पुढाकार घेवून रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरु व्हावे व इतर नागरिकांना या वळण रस्त्याचा लाभ व्हावा तसेच अतिक्रमण केलेल्या नागरिकांना सुद्धा त्यांचे घर मिळावे याकरिता शासन स्तरावर अथक प्रयत्न केले. त्यांच्या या सततच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळले असून बडनेरा परिसरातील चमन नगर येथील ७७ अतिक्रमणधारकांना अखेर नियमित लीज पट्टयाचे वाटप करण्यात आले. युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या हस्ते हे



लीज पट्टे प्रदान करण्यात आले. यामुळे अनेक वर्षापासून आपल्या स्व:ताच्या घरांच्या मालकीची स्वप्न पाहणाऱ्या गोर-गरिब नागरिकांचा मार्ग मोकळा झाला आहे. कार्यक्रमात बोलताना सुनिल राणा म्हणाले की, 'आ. रवि राणा यांनी या भागातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी सतत पाठपुरावा केल्याने आज त्यांना कायदेशीर हक्क प्राप्त झाला आहे. पुढील काळात अकोली वळण रस्त्याचे कामही लवकरच सुरू होणार असून त्यामुळे परिसराचा विकास वेगाने होणार असल्याचे यावेळी सुनिल राणा यांनी स्पष्ट केले.' लीज वाटप सोहळ्याला मनपाच्या विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये बडनेरा झोन क्र. ४ चे झोन अधिकारी तायडे, ए.डी.टी.पी. वानखडे, सर्वेअर रामटेके, सहाय्यक अभियंता अमिन नुर, मनपा अभियंता तांबेकर, विधी अधिकारी मांडवे आणि सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे आदी मान्यवरांचा समावेश होता. अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे लीज वाटप प्रक्रिया सुरळीत पार पडली. नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत आ. रवि राणा आणि युवा स्वाभिमान पार्टीचे आभार व्यक्त केले. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मिळालेल्या या हक्कामुळे आता नागरिकांना घरांसाठी आवश्यक सुविधा, कर्जप्रक्रिया आणि इतर विकासात्मक सुविधांचा मार्ग खुला झाला आहे. यावेळी रऊफ पटेल, जाकीर जमाल, सुधिर लवणकर, अजमत खान, शहजाद भाई, हाजी जाकीर, सत्तार पहेलवान, अब्दुल सलिम, अयाज भाई, कमरोद्दीन भाई, राजा भाई, अनिकेत शेकोकार व असंख्य नागरिक उपस्थित होते.

## कुष्ठरोग तंत्रज्ञांचे त्वचाविलेपन उजळणी प्रशिक्षण

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अमरावती** : कोठारा लेप्रसी मिशन हॉस्पिटल आणि सहाय्यक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग यांच्या वतीने सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी जिल्ह्यामध्ये कार्यरत कुष्ठरोग तंत्रज्ञांचे त्वचाविलेपन उजळणी प्रशिक्षण पार पडले. कोठारा लेप्रसी हॉस्पिटल येथे हे प्रशिक्षण घेण्यात आले. कुष्ठरोग आजाराचे निदान करण्यासाठी आवश्यक असलेली ही तपासणी आहे. सर्वसामान्यपणे वैद्यकीय व्यावसायिकांद्वारे लक्षणांवरून कुष्ठरोग आजाराचे निदान वैद्यकीय तपासणीद्वारे निश्चित केले जाते. निदानास कठीण असलेल्या रुग्णांकरिता किंवा गुंतागुंतीच्या रुग्णांकरिता त्वचा विलेपन पद्धतीद्वारे निदान केले जाते. ही तपासणी




कोठारा लेप्रसी हॉस्पिटल आणि डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात उपलब्ध आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्णांच्या सोईकरिता ही तपासणी कुष्ठरोग तंत्रज्ञांना सुलभतेने करता यावी, याकरिता एक दिवसीय उजळणी प्रशिक्षण घेण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. मिलिंद चव्हाण, सहाय्यक वैद्यकीय अधीक्षक डॉ. सौरभ देशमुख, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी गुंतागुंतीच्या रुग्णांमध्ये कुष्ठरोगाचे निदान करण्यासाठी त्वचा विलेपनाची प्रक्रिया आणि प्रयोगशाळेतील तपासणी याविषयी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थीकडून प्रात्यक्षिकेही करण्यात आली. समारोपाप्रसंगी सहाय्यक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग डॉ. पूनम मोहोकार यांनी २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा शून्य प्रसार ध्येय साध्य करण्यासाठी प्रशिक्षण महत्वाचे असल्याचे सांगितले. वैद्यकीय अधिकारी डॉ. विनंती नवरे, अवैद्यकीय पर्यवेक्षक दीपक गडलिंग, सल्लागार सुरेश धोंडगे यांनी मार्गदर्शन केले.

## मराठा, कुणबी, देशमुख समाजाचा उपवर-वर वधु परिचय मेळावा रविवारी

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अमरावती:** अमरावती जिल्हा मराठा महासंघ व शुभमंगलम् मॅरेज ब्युरोच्या विद्यमाने मराठा, कुणबी, देशमुख समाजाचा उपवर-वर वधु परिचय मेळावा रविवार दि. १४.१२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता शुभमंगलम् हॉल, मोती बाग जवळ, अमरावती येथे आयोजीत करण्यात आला आहे.

मेळाव्याचे अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हा मराठा महासंघाचे उपाध्यक्ष डॉ.प्रा.श्री. रमेशराव गोटखडे, दैनिक हिंदूस्थानचे प्रसिध्द स्तंभ लेखक गोफणदार हे राहतील. परिचय मेळाव्याचे उद्घाटक म्हणून अमरावती जिल्हा मराठा महासंघाचे अध्यक्ष श्री. अनिलराव महल्ले राहतील. प्रमुख अतिथी म्हणून ॲड.श्री. खराटे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, तसेच श्री.प्रा. भालचंद्रजी घोंगडे, श्री. विनायकराव रोडे, श्री. सुधाकरराव टाले माजी अध्यक्ष, श्री. भास्करराव गावंडे, महासचिव श्री. बाबुराव देशमुख, सचिव श्री. आशिषभाऊ देशमुख, सदस्य, सौ. डॉ. भारतीताई जाधव सर्व सन्मानिय सदस्य उपस्थित राहणार आहे. या प्रसंगी सदर कार्यक्रमास उपवर मुले-मुली, घटस्फोटीत मुले-मुली व त्यांचे पालक - उपस्थित राहणार असून परिचय देणार आहे.

तरी समाज बांधवांनी उपस्थित रहावे ही विनंती.

## हरिसाल सरपंच पदावरुन विजय दारसिबे यांचा पायउतार

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**धारणी:** देशाचे पहिले डिजिटल व्हिलेज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरिसाल ग्रामपंचायतीत मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. थेट जनतेतून निवडून आलेले महाराष्ट्र पंचायत राज अभियानाचे पहिले सरपंच विजय दारसिंबे यांचे सरपंच पद अमरावतीचे अप्पर जिल्हाधिकारी गोविंदा दाणेज यांनी अधिकृत आदेशाने खारीज केले आहे. उपसरपंच गणपत गायन आणि सदस्य प्रवीण पंडुले यांनी सरपंचांच्या विविध गैरव्यवहारांबाबत दिलेल्या तक्रारीची सखोल चौकशी केल्यानंतर हा निर्णायक आदेश देण्यात आला. तक्रारीनुसार, सरपंच विजय दारसिंबे यांनी 'घरकुल' योजनेचा लाभ आपल्या वडिलांच्या नावावर घेतला, जे वडील त्या काळात वन विभागात कार्यरत असल्याने पात्रतेबाहेर होते. तसेच ग्रामपंचायतीमधील इतर शासकीय कामांमध्येही गंभीर अनियमितता, पदाचा दुरुपयोग व प्रशासकीय नियमांचे उल्लंघन झाल्याचे चौकशीत स्पष्ट झाले. अप्पर जिल्हाधिकारी यांनी सर्व पुरावे आणि जबाबांची तपासणी करून सरपंचपद तात्काळ रद्द करण्याचा निर्णय घेतला.

## शहरातील महत्वपूर्ण प्रकल्प मंजूर निधी वितरीतकरण्याचे उच्चस्तरीय बैठकित आदेश

**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री व आमदार रवी राणा यांची प्रमुख उपस्थिती**

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अमरावती :** अमरावती जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच उपमुख्यमंत्री (वित्त) अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत, पालकमंत्री व आमदार रवी राणा यांचे पुढाकारातून भाजप शहर अध्यक्ष डॉ नितीन धांडे , आमदार संजय खोडके, आमदार सुलभा संजय खोडके,यांचे अपस्थिततून महत्त्वपूर्ण निर्णय बैठक आज पार पडली. शहर व जिल्ह्यातील प्रलंबित विकास प्रकल्पांना गती देण्यासाठी या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मनपा हद्दीतील पेरी फेरी प्लॅन (सिमेंट रोड क्षेत्र) डिटेल आराखडा तात्काळ मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच महानगरपालिकेसाठी सुमारे ५०० कोटी रुपयांची विकासनिधी तरतूद करण्यास मंजुरी देण्यात आली. मनपाच्या नवीन



इमारतीसाठी १०० कोटी रुपये देण्याचाही निर्णय या बैठकीत झाला. शहरातील वाहतूक व्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या राजकमल उड्डाणपुलासाठी १७ कोटी रुपये मंजूर करून काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पीआर कार्डचे वितरण युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश देखील या बैठकीत देण्यात आले. धार्मिक व सांस्कृतिक विकासाच्या अनुषंगाने कोंडेश्वर येथील बुद्धभूमीचा प्रस्ताव मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय इरविन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अद्ययावत पुतळा व परिसराचे सौंदर्यीकरण सहा महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. नेहरू मैदान कायम राहणार ,टाऊन हॉलचे सौंदर्यीकरण, अमरावती मेगा टेक्सटाइल पार्क, तसेच अन्य औद्योगिक प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

अंबा देवी–एकवीरा देवी मंदिर परिसराचा संपूर्ण आराखडा अंतिम करून विकासकामे सुरू करण्यास देखील मंजुरी देण्यात आली. अमरावतीतील आयटी पार्क प्रकल्प लवकरात लवकर सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री यांनी संबंधित विभागांना दिले. या बैठकीला मुख्य सचिव राजेश कुमार, विविध विभागाचे प्रधान सचिव, विभागीय आयुक्त श्वेता सिंगल, जिल्हाधिकारी येरेकर, मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक चांडक, तसेच सर्व संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अमरावती शहरातील भाजपा चे अध्यक्ष डॉ नितीन धांडे, भाजपा नेते सुनील काळे, अँड प्रशांत देशपांडे, संजय तिरटकर, बादल कुलकर्णी, अँड चंद्रशेखर डोरले, विनोद गुहे,उमेश ढोणे, शेखर बीसेन,हर्षल रेवने, अविनाश काळे. प्रशांत पवार,आदी पदाधिकारी उपस्थित होते.अमरावतीच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले हे निर्णय शहराच्या व्यापक प्रगतीस चालना देणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्हाधिकारी कार्यालयात मानवी हक्क दिन साजरा

**अकोला:** जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त मार्गदर्शनपर कार्यक्रम झाला. यावेळी सामाजिक न्याय संरक्षण संघाचे अध्यक्ष ॲड. विजयकुमार गडलिंगे, जिल्हा कारागृह अधीक्षक विजय काळे, विधी अधिकारी संदीप कंकाळ व अधीक्षक शाम धनमने यांनी मार्गदर्शन केले. मानवी हक्कांची व्याख्या, संबंधित विधी व कायदे, जाहीरनामा आदी विविध बाबतीत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

## शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अडगाव:** रेल्वे प्रकल्पाच्या कामासाठी कंत्राटदारांना नदी व नाल्यातुन गौण खनीज संपत्ती खोदकाम बंद करण्यात यावे अशी मागणी शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कौठकार यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याकडे केली.

अकोट व तेल्हारा भागातील सर्व नदी नाल्यातील गौण खनिजावर प्राथमिक अधिकार हा त्या काठी वसलेल्या गावांचा आहे आणि शहरांचा आहे ही गौणखनिज संपत्ती वर्षानुवर्षे गोळा झालेली आहे त्या संपत्तीचा जर संपुर्ण खनन झाले तर यांचे दुरगामी परिणाम स्थानिक लोकांच्या जिवनावर व पर्यावरणावर होणार आहे. पंतप्रधान घरकुल आवास योजना करीता लागणारी वाळु चा तुटवडा निर्माण होवुन मोठ्या प्रमाणात वाळूची दरवाढ होवुन ती योजना बंद पडण्याची शक्यता जाणवते. रमाई अनुसुचित जाती (एस.सी) साठी रमाई आवास योजना करीता लागणारी वाळु व गौणखनिज स्वस्त दरात नदी व नाल्यातुन उपलब्ध होत असतात. हा संपुर्ण उपसा रेल्वेच्या कामाकरीता वापरल्यास या योजनेच्या खर्चात अवाढव्य वाढ होवुन गरीबांना ही योजना उपयुक्त ठरणार नाही. नाले व नदी काठी असलेल्या शेतीमध्ये जाण्यासाठी शेतकरी नदीचा वापर शेत रस्ता म्हणुन करतात. कारण बरेच शेतरस्ते हे कच्या स्वरूपात असल्याने नदी नाल्यातुन वाहतुक करणे सोयीस्कर ठरते. नदी नाल्याचे खोलीकरण केल्यास नदी काठच्या शेतात भूस्खलन होवुन लाखो टन सुपीक माती नदीत वाहुन जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान होईल व भुस्खलनामुळे वृक्ष नदी नाल्यात वाहून जातील. यामुळे निसर्गाचा समतोल राहणार नाही याचा दुरगामी परिणाम पर्यावरणावर होईल. पर्यावरणाचा -हास झाल्यास भुस्खलनामुळे जमीनीची धुप होत असल्याने नदी नाल्यांच्या खोलीकरणातुन निघणारी गौण खनिजे रेल्वेच्या कामासाठी वापरण्यावर बंदी घालण्यात यावी असे निवेदनात म्हटले आहे.

## रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात रामदेव भजनसंध्याचे आयोजन

प्रतिनिधी १३ डिसेंबर



**अकोला:** लाखो भक्तांचे तारणहार रामसापीर रामदेवबाबा यांच्या भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.पौष सुदी दुजच्या पावन पर्वावर श्रीरामदेवबाबा श्रीश्यामबाबा सेवा समितीच्या वतीने स्थानीय गीता नगर परिसरातील श्रीरामदेवबाबा -श्रीश्यामबाबा मंदिरात सोमवार दि २२ डिसेंबर रोजी साय ७ वाजता रामदेवबाबा यांच्या भव्य भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.या भजन संध्येत भजन गायिका डॉ सौ मोनिका साबू,प्रेरणा चांडक,सौ सविता गांधी व सौ सोनल चितलांगे या आपल्या संगीतमय वाणीतुन रामसापीर बाबा रामदेव यांची भजने सादर करणार आहेत.या भजन उत्सवात भक्तांसाठी बाबाची दिव्य ज्योत साकार करण्यात येऊन यात सामूहिक आरती,दिव्य रोषणाई,मंदिर सजावट करण्यात येणार आहे.या भजन संध्येचा सर्व महिला,पुरुष भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्री रामदेवबाबा श्रीश्यामबाबा सेवा समितीच्या समस्त पदाधिकारी व ट्रस्टी वर्गाने केले.

## बाळापूर न. प. अध्यक्षपदासाठी सर्व उमेदवारांविरोधात दाखल हरकती जिल्हा न्यायालयाने फेटाळल्या

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**बाळापूर :** बाळापूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मधील अध्यक्षपदासाठी स्पर्धेत असलेल्या सर्व उमेदवारांविरुद्ध एका उमेदवाराने दाखल केलेली निवडणूक याचिका (इलेक्शन पिटिशन) जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला यांनी ०१ डिसेंबर २०२५ रोजी फेटाळून लावली आहे. सदर हरकत इलेक्शन पिटिशन क्र. १/२०२५ म्हणून दाखल झाली होती. प्रकरणाचा पूर्ण सुनावणीअंती न्यायालयाने ही याचिका ‘वादग्रस्त – पूर्ण सुनावणीनंतर फेटाळण्यात आली / नामंजूर करण्यात आली’ असा निर्णय देत प्रकरण निकाली काढले. या निर्णयामुळे अध्यक्षपदासाठी सर्व उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला असून निवडणूक प्रक्रियेतील अडथळा दूर झाला आहे.

# अकोट शहरात गॅस सिलिंडरचा तुटवडा

### ◆ भुईभार एजन्सी समोर सिलिंडरसाठी रांगा

प्रतिनिधी १३ डिसेंबर



**अकोट:** तालुक्यामध्ये दिवाळीपासूनच गॅस सिलेंडरचा तुटवडा आहे. अजूनही त्यात सुधारणा नाही. महिला व ज्येष्ठ नागरिकांना थंडीत गॅस साठी रांगा लावाव्या लागत आहे. यामुळे संताप व्यक्त होत आहे.

अकोट शहरात भुईभार गॅस एजन्सी मुख्य असून येथून तालुक्याला गॅस सिलेंडरचा पुरवठा होतो. सध्या ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिक सिलेंडर साठी सकाळच्या कडाक्याच्या थंडीमध्ये पहाटे सहा वाजता पासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत कामधंदे बाजूला ठेवून रांगेत उभे राहतात. महिला व ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होत आहे. अकोला रोडवर प्रचंड गर्दीमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. शासनाने ठरवून दिलेल्या दरात सिलेंडर मिळत नाही परंतु वाढीव दरात सिलेंडर तात्काळ कसे मिळते अशी विचारणा केली जात आहे. महिला व नागरिक गॅस एजन्सीवर रोष व्यक्त करीत आहेत. पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी अकोट शहरात टंचाई निर्माण झाल्याचे मान्य केले परंतु ग्राहकांवर अन्याय होत असेल तर संबंधितांवर कारवाई करू असे सांगितले. तरही परिस्थिती पंधरा दिवसात सुधारेल असे भुईभार गॅस एजन्सीचे सुधाकर भुईभार म्हणाले.

## विद्यार्थिनीच्या आत्महत्येस कारणीभूत शाळेवर कार्यवाही करा, परीट धोबी सेवा मंडळाची मागणी

प्रतिनिधी १३ डिसेंबर



**अकोला:** स्थानीय सेन्ट एन्स इंग्लिश मिडियम स्कुल मध्ये शिकणाऱ्या १३ वर्षिय अल्पवयीन विद्यार्थीनीचा मानसिक छळ व आत्महत्या केल्याच्या संदर्भात पालकांनी शाळेकडे वारंवार तक्रार करून सुध्दा शाळेने कोणतीही कार्यवाही केली नाही.सबब या दोषी शाळेवर त्वरित कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र परीट धोबी सेवा मंडळाने केली पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना मंडळाच्या वतीने निवेदन देण्यात आले.या निवेदनात विद्यार्थीनीच्या आत्महत्या प्रकरणात प्रस्तुत शाळा ही दोषी असून शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत निष्काळजीपणा केला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच सदर प्रकरणात संबंधित आरोपी विद्यार्थ्यांवर आणि त्याच्या वडिलांवर गुन्हा नोंदवुन कारवाई सुरू झाली असली तरी, या दुर्देवी मृत्युस सर्वाधीक जबाबदार असलेल्यावर अद्याप कोणतीही कार्यवाई करण्यात आलेली नाही, ही खेदजनक बाब असल्याचे महाराष्ट्र राज्य परिट धोबी परिषद सेवा मंडळ, जिल्हा शाखा अकोलाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हणण्यात आले असून विद्यार्थ्यांना असुरक्षित वातावरण निर्माण करणारे शाळेतील ठफ्रि कल्चरठ त्वरीत तपासण्यात यावे व दोषी शिक्षक, कर्मचारी आणि व्यवस्थापनाविरूध्द कायद्याच्या अधिन राहुन आवश्यक ती सर्व पाउले उचलण्यात येऊन पिडीत कुटूंबाला न्याय मिळवुन देण्यासाठी प्रशासनाने प्रभावी आणि ठोस कारवाई करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी व शिक्षणाधि कारी यांना पाठविण्यात आल्या आहेत.मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनात व महाराष्ट्र कार्याध्यक्ष गोपी अण्णा चाकर यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनावर जगदीश चाकर, चेतन कोंडाने, भारत पवार,उल्लास मोकलकर, राजू मंजुलकर,अमोल दंबेलकर, दीपक पवार, अतुल पवार ,महेंद्र पवार ,मनोज पवार, नवल बनिया, गोविंद बनिया ,धर्मराज पवार ,प्रतीक रोकडे ,भालेराव आदींच्या सह्या आहेत.

## गुटखा बंदी नुसती कागदावर?



### ◆ तालुक्यात बिनदिक्कत विक्रीमुळे तरुणाई धोक्यात

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**तेल्हारा :** राज्यात गुटखाबंदी असतानाही तेल्हारा तालुक्यात पानटपरी, किराणा दुकाने आणि अगदी लहान वस्त्यांमध्येही गुटख्याची बिनदिक्कत विक्री सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलीस प्रशासनाच्या 'डोळेझाकी'मुळे की काय, हे गुटख्याचे विक्रेते कायद्याची कोणतीही भीती न बाळगता खुलेआम आपले अवैध धंदे चालवत आहेत. यामुळे विशेषतः तरुणाई आणि शालेय विद्यार्थी व्यसनाधीनतेच्या गंभीर विळख्यात अडकत चालले आहेत.

स्थानिक पानटपऱ्यांवर आणि छोट्या दुकानांमध्येही गुटख्याचे पुड्या सहज उपलब्ध आहेत. दिवसातून अनेकदा तरुण मुले गुटखा खाताना दिसतात. कायद्याचे भय दिसत नाही. केवळ निवडणुकीच्या काळात थोडी कारवाई होते, नंतर पुन्हा 'जैसे थे' परिस्थिती होते.असे येथील जागरूक नागरिकाने सांगितले.

कारवाई फक्त दंडाची पावती फाडून संपवली जाते, ज्यामुळे विक्रेत्यांना दंडाची रक्कम ही धंद्याचा भाग वाटू लागली आहे.

#### नियम कठोर, अंमलबजावणी शून्य!

राज्य सरकारने गुटखा, पान मसाला आणि सुगंधित तंबाखू उत्पादनांवर कडक बंदी घातली आहे. बंदी असलेल्या गुटख्याची विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाईचे निर्देशही आहेत. मात्र, तालुक्यात या नियमांचे पालन होताना दिसत नाही. स्थानिक पातळीवर पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन या दोन्ही विभागांकडून अपेक्षित असलेला संयुक्त व कठोर समन्वय आणि धाडसी कारवाईचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे.

#### 'अर्थपूर्ण' व्यवहारामुळे कारवाईला ब्रेक?

गुटख्याची विक्री हा थेट आरोग्याच्या नियमांचा भंग असून, अन्न सुरक्षा कायद्यानुसार (Food Safetyed Act) तो गुन्हा आहे. या विक्रीवर नियंत्रण ठेवण्याची प्राथमिक जबाबदारी अन्न व औषध प्रशासन विभागाची आहे. जेव्हा कारवाई होते, तेव्हा केवळ किरकोळ विक्रेत्यांवर केली जाते आणि मुख्य तस्कर व साठवणूकदार मात्र मोकळे राहतात.

#### सामाजिक संस्थांकडून तीव्र मागणी

हा केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नसून, सार्वजनिक आरोग्याचा आणि युवा पिढीच्या भविष्याचा गंभीर प्रश्न आहे. पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाने एकत्र येऊन तालुक्यात धडक मोहीम राबवावी आणि गुटखा तस्करांना व विक्रेत्यांना कठोर शासन करावे, अन्यथा ही गुटखा बंदीची केवळ 'नुसतीच बात' राहील.

काही ठिकाणी अन्न प्रशासन किंवा पोलीस प्रशासन हे दोन विभागांमध्ये समन्वय नसल्याचे भासवून कारवाई टाळत असल्याचेही बोलले जात आहे.

## उपनिरीक्षक नीलेश ठाकरेंवरील ‘गैरवर्तना’च्या आरोपाची नि:पक्ष चौकशी व्हावी

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**तेल्हारा:** शिवसेना तालुकाप्रमुख प्रवीण वैष्णव यांनी येथील पोलीस उपनिरीक्षक नीलेश ठाकरे यांच्यावर केलेला 'गैरवर्तनाचा' आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा संशय व्यक्त होत आहे. शहरातील नागरिकांनी आणि पोलीस दलातील काही घटकांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून कोणत्याही निर्दोष अधिकाऱ्यावर अन्याय होणार नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, उपनिरीक्षक नीलेश ठाकरे हे आपल्या कार्यकाळात शिस्तबद्ध आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात. नगरपरिषद निवडणुकीदरम्यान शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळेच काही राजकीय पक्षांना त्यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही, ज्यामुळे ही तक्रार दाखल करण्यात आल्याचे बोलले जात आहे.

ठाकरे आपले काम प्रामाणिकपणे करतात. निवडणुकीच्या वेळी ते कोणाच्या दबावाखाली आले नाहीत, म्हणूनच त्यांच्यावर खोटे आरोप केले जात आहेत. गृहमंत्र्यांनी फक्त तक्रारीवर नव्हे, तर त्यामागील राजकीय हस्तक्षेपाचीही चौकशी करावी अशी मागणी आहे.

तक्रारदार प्रवीण वैष्णव यांनी उपनिरीक्षक ठाकरेंनी नगरपरिषद निवडणुकीदरम्यान व इतर वेळी अपमानजनक वर्तन केल्याचा आरोप केला आहे.

मात्र, पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, ठाकरेंनी केवळ आपले सरकारी कर्तव्य बजावले आहे. गणेश मंडळातील एका जुगार प्रकरणातही त्यांनी कायदेशीर कारवाई केली होती, ज्यामुळे काही असामाजिक घटकांमध्ये नाराजी होती.

गृहराज्यमंत्र्यांनी पोलीस अधीक्षकांना चौकशीचे आदेश दिले असले तरी, ही चौकशी निष्पक्ष असावी आणि केवळ राजकीय दबावाखालील आरोपांवर आधारित नसावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महापरिनिर्वाण दिनी रक्तदान उपक्रम

प्रतिनिधी १३ डिसेंबर



**पातूर:** महापरिनिर्वाण दिन तसेच लोकसेवा हीच पूजा मानणारे स्व. उदय गायकवाड यांच्या प्रथम स्मृतिप्रित्यर्थ ग्रामपंचायत बाभुळगाव येथे १२ रोजी रक्तदान शिबिर झाले. शिबिराचे आयोजन वंचित बहुजन आघाडी पातूर तालुका (ग्रामीण) व उदय गायकवाड मित्र परिवार यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा लोकचळवळीचे संस्थाध्यक्ष अमोल घायवट, सामाजिक कार्यकर्ते गोपाल गायकवाड, अविनाश पोहरे, ग्रामीण युवा संघटनेचे संस्थाध्यक्ष सतिश हातोले, प्रशांत वानखडे, किशोर सुरवाडे, लावण्य अतकर,अक्षय अत्तरकार यांचे सहकार्य लाभले.

## मोफत प्लास्टीक सर्जरी, त्वचा रोग आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**अकोट:** रोटरी क्लब अकोट व्हिजनच्या वतीने १४ डिसेंबरला आदिवासी आश्रम शाळा, बोराखडे हॉस्पीटल जवळ बस स्टँडच्या बाजुला मोफत प्लास्टीक सर्जरी, आरोग्य् तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. जन्मापासून फाटलेले व दुभंगलेले ओठ, जळालेल्या रुग्णांवर मोफत प्लास्टिक सर्जरी शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. डॉ. मयुर अग्रवाल, डॉ. श्रध्दा मयुर अग्रवाल सेवा देणार आहेत. मोफत दंतरोग् तपासणी व उपचार करण्यात येतील. त्यामध्ये डॉ. तुषार वोरा व डॉ.शकुन सराफ सेवा देणार आहेत. त्वचा रोग तपासणी डॉ.आरती अंबळकार करतील. नेत्र तपासणी डॉ.दर्शन कुलट , डॉ.विनोद वंजारा, डॉ. अमर काळे, स्त्री रोग उपचारा डॉ. शितल गावंडे व डॉ. श्वेता येऊल, डॉ. हृशीकेश येऊल व डॉ.सुरज व्यवहारे सेवा देतील. आहेत हयात बिपी शुगर चेक करुन उपचार करण्यात येणार आहेत. रविवारी सकाळी १० ते २ पर्यंत आदिवासी आश्रम शाळा येथे उपस्थित राहावे असे आवाहन रोटरी क्लब अकोट व्हिजनचे अध्यक्ष आनंद भोरे, अतुल मालानी, नंदू शेगोकार, चेतन उपासे,दिलीप काटोले, जनसंपर्क अधिकारी नितीन शेगोकार यांनी केले आहे.

## स्कूल ऑफ स्कॉलरच्या ‘वीर तानाजी’ संस्कृत

### ◆ नाटकाने जागविला शिवकालीन इतिहास

प्रतिनिधी १३ डिसेंबर



**अकोला:** कौलखेड परिसरातील स्कूल ऑफ स्कॉलर स्कूलने ‘वीर तानाजी -- - स्वराज्यस सिंह’ हे संस्कृत भाषेतील ऐतिहासिक नाटक सादर करून शिवकालीन इतिहास जागविला. विश्वास करंडक बाल नाट्य स्पर्धेच्या रंगमंचावर संस्कृत भाषेत नाटक सादर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. ‘आधी लगीन कोंढाण्याचे, मग रायबाचे ’ या इतिहासात गाजलेल्या जोश पूर्ण प्रतिज्ञेवर आधारित या नाटकाने स्पर्धेचा दुसरा दिवस गाजविला.

‘वीर तानाजी ’ या नाटकाच्या अनुवाद, लेखन व दिग्दर्शनाची जबाबदारी स्वप्ना लांडे यांनी पार पाडली. सहाय्यक शिक्षिका भारती काळे व उज्वला कावरे यांनी त्यांना सहकार्य केले. सदर नाटकात किंजल पालखेडे, सिद्धी ठाकूर, स्वराज गावंडे, स्पृहा फुलाने, अन्वित चव्हाण, मिहीर केतकर, देवस्वी काळे, रजत गिरी, अथर्व आव्हाळे, सनी भोकरे, तनवी पाटील, भिमरत्न पळसपगार, स्पर्श जोशी व स्वराली राऊत या बालकलावंतांनी ऐतिहासिक वेशभूषेत उत्तम भूमिका वठवल्या.

१२ डिसेंबर रोजी सादर करण्यात आलेल्या व एकापेक्षा एक सरस असलेल्या या नाटकांमध्ये ज्ञानदीप इंग्लिश स्कूलचे ‘आणि सदाफुली रंगीत झाली, स्कूल ऑफ स्कॉलरचे’ ‘आनंदाचे झाड’ ‘श्री संताजी कॉन्व्हेंटचे’ ‘कसांडी एक परिक्रमा , प्लॅटिनम जुबली स्कूलचे ‘जाने कहा गये वो दिन’ ‘विवेकानंद इंग्लिश स्कूलचे’ ‘असं कसं’, जुबिली इंग्लिश स्कूल कुंभारीचे ‘आरसा’, मनुताई कन्या शाळा ‘वृक्षवल्ली आम्हा सोयरे ’, गीतांजली विद्यालय ‘मोबाईल मायाजाल’ व भारत विद्यालय ‘लेक वाचवा हो’ या नाटकांचा समावेश आहे. नाट्य महोत्सवाची जबाबदारी महोत्सवाचे प्रमुख प्रा. मधु जाधव, निमंत्रक प्रशांत गावंडे, प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, जे आर डी टाटा स्कूलच्या प्राचार्या प्रतिभा फोकमारे, स्नेहल गावंडे व सहकारी सांभाळीत आहेत.

#### आज सायंकाळी बक्षीस वितरण समारंभ

स्पर्धेचे बक्षीस वितरण १३ डिसेंबर रोजी सायंकाळी प्रमिलाताई ओक सभागृहात होईल. आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलचे परीक्षक विनय वैराळे यांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात येतील.

#### १३ डिसेंबर रोजी सादर होणारी नाटके

स्पर्धेच्या अखेरच्या दिवशी ८ नाटके साद होतील. त्यात जेआरडी टाटा स्कूलचे ‘बिंदू संदेश’ हेडगेवार माध्यमिक शाळा अकोलाचे ‘बोन्साय’, एज्युविला पब्लिक स्कूल पातुरचे ‘लाली’, किड्स झोन इंग्लिश मीडियम स्कूल बार्शीटाकळीचे ‘ कष्टाची जाणीव’, सातपुडा इंग्लिश स्कूल वरवट बकालचे ‘अण्णा ’, व स्कूल ऑफ एक्सलन्स अमरावतीचे स्वयंपूर्ण , आर. जे. चवरे हायस्कूल कारंजा लाड चे ‘खेळताड’ व डॉ. नीना वंदे आदर्श विद्यालय वरूड, अमरावती चे ‘जैसा राजा तैसी प्रजा’ या नाटकांचा समावेश आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616 | बातम्यासाठी संपर्क 9075012801

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५


# “शेतकऱ्यांच्या वेदना सरकारला दिसतच नाही का ?”

## हिवाळी अधिवेशनात आ. संजय देरकर आक्रमक

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**यवतमाळ :** राज्याच्या हिवाळी अधिवेशनात उबाठा गटाचे वणी मतदारसंघाचे आमदार संजय देरकर यांनी शेतकरी आत्महत्या, कर्जमाफी, पीक नुकसानीसह शेतकरी हिताच्या विविध ज्वलंत मुद्यांवरून भाजप सरकारला झोडपट घेत तीव्र आक्रमण केले. शेतकरी वर्गाच्या मूलभूत समस्यांकडे सत्ताधाऱ्यांचे चालू असलेले दुर्लक्ष आणि वारंवार दिली जाणारी पोकळ आश्वासने यावर त्यांनी सभागृहात जोरदार आवाज उठवला.

आ. देरकर म्हणाले की, “राज्यातील शेतकऱ्यांना दिलासादायक उपाययोजना देण्याऐवजी सरकार केवळ आश्वासनांची ढोलबाजी करते आहे.”

विशेषतः यवतमाळ जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण व त्याकडे सरकारकडून होत नसलेली तातडीची दखल ही अत्यंत चिंताजनक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. वर्षभर कर्जमाफीची घोषणा करूनही प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यात काहीच जमा न होणे ही सरकारची स्पष्ट दिशाभूल असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

यवतमाळ जिल्ह्याची ‘शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा’ म्हणून झालेली ओळख ही राज्याच्या शेतकरी धोरणातील अपयशाची जाणीव करून देणारी बाब असल्याचे आ. देरकर म्हणाले. त्यांनी सभागृहाकडे मागणी केली की, सरकारने विलंब न लावता तातडीने सर्वसमावेशक सरसकट कर्जमाफी जाहीर करावी आणि कर्जाच्या जोखडाखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.



पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १५० ■ रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६ ■ Email: citynews80@gmail.com

RNI No.-MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026

## कोळसा खाणी, बेरोजगारी, प्रदूषण व आरोग्यसेवेचे प्रश्न विधानसभेत मांडणार – आमदार संजय देरकर

हिवाळी अधिवेशन — 2025 —

प्रतिनिधी ७ डिसेंबर

**यवतमाळ :** वणी विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी शासनाने ठोस भूमिका घ्यावी, यासाठी येणाऱ्या अधिवेशनात धारदार प्रश्न उपस्थित करणार असल्याची माहिती वणी विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय देरकर यांनी दिली. वणी परिसरात १३ कोळसा खाणी, रेल्वे सायडींग व कोल डेपो असल्याने हा भाग औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचा झाला असला तरी स्थानिकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

आ. संजय देरकर म्हणाले, कोळसा खाणींसाठी मोठ्या प्रमाणावर जमिनी संपादित करण्यात आल्या. अनेक शेतकऱ्यांना आपली उपजिविका गमवावी लागली. मात्र ज्यांच्या जमिनी गेल्या त्या भूमिपुत्रांना रोजगार देण्याचे आश्वासन आजही पूर्ण करण्यात आलेले नाही. खाण क्षेत्रात परप्रांतीय कुशल कारागीरांची भरती होत असून, स्थानिक युवकांकडे दुर्लक्ष केले जात आहे. रोजगाराच्या संधींमध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्यासाठी स्वतंत्र कायदा करावा, अशी मागणी ते विधानसभेत ठोसपणे मांडणार आहेत. औद्योगिक धुरामुळे वणी परिसरात प्रदूषण गंभीर पातळीवर पोहोचले असून, शेतीवर त्याचा मोठा परिणाम होत आहे. सोयाबीन व कपाशीची पिके काळी पडून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. मात्र या नुकसानीबाबत कोणतीही मदत अद्याप मिळालेली नाही. प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर पावले उचलावीत आणि शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ते

➤ पान २ वर



अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची हालाखीही त्यांनी अधोरेखित केली. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसारखी प्रमुख पिके पावसामुळे पाण्याखाली गेली असून, शासनाकडून मिळणारी मदत अत्यंत तुटपुंजी असल्याने शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडून पडल्याची परिस्थिती त्यांनी मांडली.

सोयाबीन खरेदी प्रक्रियेतील अडचणींचा उल्लेख करताना देरकर यांनी सांगितले की, सततच्या पावसामुळे सोयाबीनवर काळे डाग पडल्याने शासकीय खरेदी केंद्रांकडून कठोर निकष लावले जात आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना कमी दरात पीक विकण्याची वेळ येत असून ते अधिक कर्जबाजारी होत आहेत.

कापूस उत्पादकांबाबतही नाफेडच्या जाचक अटींमुळे शेतकरी त्रस्त असल्याचे त्यांनी सांगितले. ओलावा किंवा किंचित काळेपणा आढळल्यास कापूस नाकारला जातो आणि शेतकऱ्यांना खेडेगावातील व्यापाऱ्यांकडे कमी दरात कापूस विकावा लागतो, अशी परिस्थिती त्यांनी सभागृहात मांडली.

■ शेवटी, आ. देरकर यांनी स्पष्ट केले की, “शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत माझा लढा सुरूच राहील.” हिवाळी अधिवेशनात त्यांनी केलेल्या जोरदार हल्लाबोलामुळे शेतकरी प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

# 19.53 लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त, 5 जण ताब्यात

प्रतिनिधी १३ डिसेंबर



**यवतमाळ :** महाराष्ट्रात बंदी असलेला सुगंधित पान मसाला व गुटखा मोठ्या प्रमाणात तस्करी करणाऱ्या टोळीला यवतमाळ स्थानिक गुन्हा शाखा पोलिसांनी आज पहाटे चांगलाच धडा शिकवला. आदिलाबाद (तेलंगणा) येथून खरेदी करून पांढरकवडा-घाटंजी-यवतमाळ मार्गे अमरावतीकडे नेण्यात येणारा सुमारे १९ लाख ५३ हजार ७०० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व दोन वाहने पोलिसांनी जप्त केली. याप्रकरणी अमरावती जिल्ह्यातील बडनेरा परिसरातील पाच जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी जिल्ह्यात अवैध गुटखा-तंबाखू, नायलॉन मांजा व जनावरांच्या तस्करीवर कडक कारवाईचे आदेश दिले होते. त्याच अनुषंगाने स्थानिक गुन्हा शाखेला आज पहाटे चार ते पाच वाजता खात्रीलायक गोपनीय बातमी मिळाली की, आदिलाबादहून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा घेऊन दोन वाहने अमरावतीकडे येत आहेत.

या माहितीवरून पोलीस निरीक्षक सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनात सपोनि मनिष गावंडे यांच्या पथकाने घाटंजी टी-पॉइंटजवळ नागपूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा लावला. पहाटे संशयित वर्णनातील बोलेरो पिकअप (क्र. MH-27 BX-9444) व त्याच्या पुढे पायलट म्हणून जाणारी पांढरी हुंडई झेंट कार (क्र. MH-04 HN-4589) दिसताच पोलिसांनी दोन्ही वाहने थांबवली.

झडतीत बोलेरो पिकअपमध्ये भाजीपाल्याच्या रिकाम्या प्लॅस्टिक क्रेट्सच्या आड २० पोत्यांमध्ये HOT Premium Pan Masala व H-5 Premium Chewing Tobacco या प्रतिबंधित ब्रँडचा सुगंधित गुटखा आढळला. एकूण मुद्देमालाची किंमत पोलिसांनी १९,५३,७०० रुपये अशी जाहीर केली आहे. यात ७.१२,७०० रुपयांचा गुटखा, ५,५०० रुपयांचे रिकामे क्रेट्स, ७ लाख किमतीचा बोलेरो पिकअप, ५ लाख किमतीची झेंट कार आणि ४१,००० रुपयांचे पाच मोबाईल यांचा समावेश आहे.

ताब्यात घेण्यात आलेले आरोपी शेख अझजर शेख करीम (वय २५, रा. मोतीनगर, जुनी वस्ती, बडनेरा, अमरावती) – झेंट कार चालक. अयाज खान अख्तर खान (वय ३७, अलमाज कॉलनी, बडनेरा). शेख शोएब शेख इसाक (वय २९, सावंगी मनापुर, चांदूर रेल्वे, अमरावती) – बोलेरो चालक हमीद खान हबीब खान (वय ५३, जुनी वस्ती, बडनेरा). अब्दुल मुकीम अब्दुल फारूक (वय ३६, इस्लामी चौक, बडनेरा)

सदर कारवाई सपोनि मनिष गावंडे, पोउपनि गजानन राजमलु, सफौ साजिद, योगेश गटलेवार, पोहवा रुपेश पाली, योगेश डगवार, प्रशांत हेडाऊ, रितुराज मेडवे, सचिन घुगे, पोशि सुनिल पैठणे, आकाश सहारे, आकाश सुर्यवंशी, देवेंद्र होले यांच्या पथकाने यशस्वी केली. महाराष्ट्रात २०१२ पासूनच सुगंधित व तंबाखूयुक्त गुटखा व पान मसाल्यावर पूर्णपणे बंदी आहे. तरीही तेलंगणातून मोठ्या प्रमाणात त्याची तस्करी होत असते. यवतमाळ पोलिसांच्या या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुटखा तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

# पोफाळी पोलिस स्टेशनसमोर मटका जुगार

## नवीन ठाणेदारांच्या कार्यकाळात कारवाई होणार का?

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**पोफाळी :** पोलिस स्टेशनच्या अगदी समोरच दिवसाढवळ्या चालणारा अवैध मटका जुगार हा परिसरातील सर्वांत धक्कादायक आणि निर्भयपणे सुरू असलेला बेकायदा धंदा ठरला आहे. पूर्वीच्या ठाणेदारांच्या कार्यकाळात या धंद्याकडे दुर्लक्ष झाल्याने तो फोफावत गेला, अशी स्थानिकांमध्ये चर्चा आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या जुगारामुळे तरुण पिढी दिशाभूल होत असून, अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली आहेत.

या अवैध अड्ड्याची सर्वांत गंभीर बाब म्हणजे तो पोलिस स्टेशनच्या थेट समोरच चालतो आहे. यामुळे कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. निर्भयपणे जुगार खेळला जाण्याचे हे चित्र पाहून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या पालकांनी वारंवार तक्रारी केल्या, तरी ठोस कारवाई झाली नाही. पोलिसांच्या या दुर्लक्षामुळे जनतेत अविश्वास निर्माण झाला असून, 'या अवैध धंद्यांना कोणाचा वरदहस्त आहे?' असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, नुकतेच पदभार स्वीकारलेले नवे ठाणेदार निलेश शेंबडे यांच्या कार्यकाळाबाबत गावात आशेचे वातावरण आहे. शिस्तप्रिय आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची त्यांची ख्याती असल्याने, त्यांच्या येण्याने हा मटका धंदा बंद होईल का, याची उत्सुकता आहे. नागरिकांनी लवकरात लवकर कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

स्थानिकांची मागणी आहे की, पोलिस प्रशासनाने तातडीने छापे टाकावेत, संबंधितांवर कठोर गुन्हे दाखल करावेत आणि वाढत्या जुगारामुळे बिघडणारी सामाजिक स्थिती रोखावी. पोफाळीतील पोलिस स्टेशनसमोरच सुरू असलेल्या या अवैध धंद्यावर ठोस कारवाई होईल की पूर्वीप्रमाणेच सर्व तसेच राहील, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# अवैध रेती वाहतुक; ट्रॅक्टर जप्त

प्रतिनिधी १३ डिसेंबर

■ **महागाव :** तालुक्यातील पादन शिरफुली-डोंगरगाव रस्त्यावरून अवैधरित्या रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर महसूल विभागाच्या पथकाने जप्त केला. ही कारवाई शुक्रवारी दुपारच्या सुमारास करण्यात आली.



उमरखेड उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईत तहसीलदार अभय मस्के, परीविक्षाधीन तहसीलदार रोहित शिंदे, नायब तहसीलदार व्ही. व्ही. पवार यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

तसेच ग्राम महसूल अधिकारी ढोणे व शेख, महसूल सेवक सदानंद जराड, सुरज लोणकर, विजय पोटे व दीपक वैरागडे यांनी विशेष सहभाग घेतला. गोपनीय माहितीच्या आधारे महसूल पथकाने गस्त वाढवून तातडीने कारवाई करत ट्रॅक्टर जप्त केला. तालुक्यात अवैध रेती वाहतुकीविरोधात पुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# रेती रस्त्यात टाकल्यावरुन मारहाण

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**दिग्रस :** दिग्रस पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या आमला येथील संतोष धुमा राठोड यांनी घराच्या बांधकामाकरिता एक ब्रास रेती रवींद्र माधव जाधव यांच्या घराच्या बाजूला रोडवर टाकली असताना, या कारणावरून किशोर राठोड, आकाश राठोड, प्रकाश राठोड, रा.आमला यांनी मिळून संतोष राठोड यांच्यावर काठीने हल्ला चढवीला आणि जखमी केले हे भांडण सोडविण्यासाठी संतोष राठोड यांचा भाचा दिलीप राठोडमध्ये आला असता त्यालाही लोखंडी रॉडने डोक्यावर मारून गंभीर जखमी केले. याप्रकरणी पोलिसांनी तिघांविरुद्ध खूनी हल्ला केल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले.

# माजी मंत्री नानाभाऊ एंबडवार यांचे निधन

प्रतिनिधी १३ डिसेंबर

■ **यवतमाळ :** माजी मंत्री नानाभाउ एंबडवार यांचे कोंघारा येथे आज शनिवारी १३ डिसेंबर रोजी वृधपकाळाने निधन झाले. उद्या १४ डिसेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. ते दोन वेळा आमदार राहिले आहे. त्याच्या मागे दिपक, रवी, आनंद अशी तीन मुले, सुन, नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे.



विदर्भ विर जांबुवंतराव धोटे यांनी फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना केली होती. यामध्ये ते संस्थापक सदस्य होते. १९७८ मध्ये फारवड ब्लॉकचे विदर्भात १७-१८ आमदार निवडून आले होते. त्यावेळी नानाभाउ एबंडवारही कॉंग्रेसमध्ये होते. दिग्रस मतदार संघातून ते विजयी झाले होते. तसेच विदर्भाच्या चळवळीत सक्रीय होते.

तसेच आणीबाणीच्या काळात दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना समर्थन दिले होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषी पंढरी ही योजना त्यांनी सुरु केली होती. पावसामुळे शेती पिकाचे नुकसान, खर्चव मदत अशी ही योजना होती. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाच्या संचालन मंडळाचे ते अध्यक्ष होते. सलग १९८९ पर्यंत ते मंत्री होते.

# ढाणकी–उमरखेड रस्त्याची चाळणी

## प्रवाशांना जीव मुठीत घेऊन करावा लागतो प्रवास

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**ढाणकी :** देशात एकीकडे समृद्धी महामार्ग, शक्तिपीठ एक्सप्रेसवे सारखे भव्य महामार्ग उभारले जात असताना, दुसरीकडे ग्रामीण भागातील रस्ते मात्र शेवटचे घटके मोजत आहेत. तालुक्यातील महत्त्वाच्या ढाणकी-उमरखेड रस्त्याची तर अनेक दिवसांपासून दुरावस्था झाली असून, त्याकडे कोणत्याही लोकप्रतिनिधीचे लक्ष गेले नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

ढाणकी हे तालुक्यातील मोठे बाजारपेठ केंद्र असल्याने या रस्त्यावर वाहतुकीचे मोठे प्रमाण आहे. मात्र उमरखेडपासून ढाणकीपर्यंतचा रस्ता खड्ड्यांनी चाळणी झाला असल्याने वाहनचालकांना वाहन चालवणेही दुरापास्त झाले आहे. परिणामी, अवघ्या ३० मिनिटांचा प्रवास आता दीड तास लागत असून, प्रवासी प्रचंड मनस्ताप सहन करत आहेत.

उमरखेड विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बंदी भागात वारंवार दौरे करतात आणि त्यांनाही याच रस्त्याने ये-जा करावी लागते. तरीही त्यांना रस्त्याची ही दुरावस्था दिसली नसावी का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. हा वाहतुकीचा मुख्य मार्ग असूनही दुरुस्तीच्या कामात अनेक वर्षांपासून अडथळे येत असल्याने हे न सुटणारे कोडे बनले आहे.

सर्वांत गंभीर बाब म्हणजे रात्रीच्या वेळी एखाद्या रुग्णाला किंवा गरोदर महिलेला उमरखेडच्या दवाखान्यात नेणेही जीवघेणे ठरते. रस्त्याच्या खराब स्थितीमुळे रुग्ण दवाखान्यात पोहोचेल की नाही, याची खात्री देता येत नाही. यापूर्वीही अशा खराब रस्त्यांमुळे अनेकांना जीव गमावावा लागला आहे.

मागील घटनांचा अनुभव लक्षात घेता, ढाणकी-उमरखेड रस्त्याच्या दुरुस्तीचे काम येणाऱ्या अधिवेशनात तरी मार्गी लागावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. अन्यथा प्रवाशांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागण्याची नामुष्की कायम राहील.



# चिन्ह वाटप ; निवडणूक रिंगणात २९१ उमेदवार

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची चिन्हवाटप प्रक्रिया गुरुवारी (११ डिसेंबर) निवडणूक निर्णय अधिकारी गोपाळ देशपांडे यांच्या कार्यालयात सुरळीत पार पडली. कोणत्याही उमेदवाराने चिन्हबदलाची मागणी न केल्याने कार्यवाहीत कोणताही विलंब झाला नाही. चिन्हवाटप पूर्ण होताच शहरातील निवडणूक वातावरण पुन्हा तापू लागले.



नगराध्यक्षपदासह ५८ नगरसेवकपदांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत प्रमुख राजकीय पक्षांत कोणतीही युती न झाल्याने भाजप, कॉंग्रेस, उद्धवसेना (ठाकरे गट), शिंदेसेना (शिंदे गट) आणि बसपा यांनी स्वतःचे उमेदवार उभे केले आहेत. त्यातच चार अपक्ष उमेदवारांची भर पडत नगराध्यक्षपदाची लढत चौरंगी झाली आहे.

पूर्वी ठरवलेल्या तारखेनुसार प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असताना अपील प्रकरणांमुळे राज्य निवडणूक आयोगाने कार्यक्रम सुधारित केल्याने निवडणूक पुढे ढकलली. प्रचारासाठी झालेला खर्च आणि परिश्रम वाया गेल्याची भावना आज उमेदवारांत व्यक्त झाली.

नव्या वेळापत्रकानुसार उमेदवारांनी पुन्हा एकदा प्रचारयुद्धाला सुरुवात केली आहे. सोशल मीडिया, व्हॉट्सअ‍ॅप मोहिमा आणि डिजीटल प्रचाराला मोठी चालना मिळत असून, वाढीव खर्चामुळे काही उमेदवारांनी खर्चमर्यादा वाढवण्याची मागणी केली आहे.

प्रचारसभांचा धडाका, घराघरातील संपर्क, रणनीती बैठका यांना वेग आला आहे. काही प्रभागांत आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले असून, वादग्रस्त प्रभाग १५-ब मधील वाद निकाली निघाल्याने तेथील प्रचारालाही गती मिळाली आहे.

एकूणच, चिन्हवाटपनंतर यवतमाळमधील निवडणुकीची रणधुमाळी पुन्हा तीव्र झाली असून पुढील काही दिवस शहराचे राजकीय तापमान चांगलेच चढण्याची चिन्हे आहेत.

> ■ शहराचे २९ प्रभागांत विभाजन करण्यात आले असून २९१ उमेदवार नगरसेवकपदासाठी रिंगणात उतरले आहेत. अनेक प्रभागांत बहुरंगी लढत असून, काही ठिकाणी अपक्ष उमेदवारही प्रमुख पक्षांना सरळ टक्कर देताना दिसत आहेत.

# ‘एमपीजे’चे सन्मानाने जगण्याचा अधिकार मोहीमेची सुरुवात

## 11 जानेवारीला होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाने समापन

प्रतिनिधी १३ डिसेंबर

**उमरखेड :** आज जीवनाचा हक्क कायदेशीररित्या हमी दिलेला असला तरी, प्रत्यक्षात लाखो लोक अजूनही सन्माननीय जीवनापासून वंचित आहेत. गरिबी, असमानता, जातीय भेदभाव, लिंग असमानता, बेरोजगारी, बेघरपणा आणि आरोग्य सेवांचा अभाव यासारख्या समस्या या अधिकाराच्या प्रत्यक्ष प्राप्तीमध्ये अडथळा आणतात. जीवन म्हणजे केवळ भौतिक अस्तित्व नाही तर सन्मानाने आणि आदराने जगण्याचा अधिकार देखील आहे.

भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला “जीवनाचा अधिकार” प्रदान करते, परंतु हा अधिकार खऱ्या अर्थाने तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो जेव्हा व्यक्तींना सन्मानाने जगण्याची संधी मिळते.




सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक असमानतेमध्ये, अनेक लोक अजूनही त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून आणि सन्माननीय जीवनापासून वंचित आहेत. ह्या बाबी लक्षात घेऊन, मुव्हमेन्ट फॉर पीस अ‍ॅन्ड जस्टीस फॉर वेलफेअर (एमपीजे) या चळवळीने “सन्मानाने जगण्याचा अधिकार” " जीवन का अधिकार - गरीमा के साथ " या शिर्षकाने एक मोहीम सुरू केली आहे. या अभियानाचा समारोप छत्रपती संभाजी नगर येथे 11जानेवारी 2026 रोजी राष्ट्रीय अधिवेशनाने होईल. "जीवनाचा अधिकार " आणि "प्रतिष्ठा" या संकल्पनांबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, उपेक्षित लोकांचा आवाज मुख्य प्रवाहात आणणे, सार्वजनिक सहभागाद्वारे संवैधानिक मूल्ये मजबूत करणे. हा अभियाना चा मुख्य उद्देश आहे.

ह्या राज्यस्तरिय अभियाना अंतर्गत जनजागृती साठी पोस्टर्स आणि सोशल मीडिया, संवाद आणि चर्चासत्र सह जिल्हास्तरीय पूर्व- जाहीर सभेचे आयोजन करण्यात येणार आहे.

या अनुषंगाने दि 25 डिसेंबर रोजी संजोग भवन येथे सायकाळी 6 वाजता जनसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेत उपस्थित राहण्याचे व अभियानात सहभागी होण्याचे आवाहन एमपीजेचे जिल्हाध्यक्ष फिरोज अन्सारी, तालुकाध्यक्ष अन्सार हुसैनी, शहराध्यक्ष मोहसीन राज यांनी शहरातील सर्व नागरिकांना, सामाजिक संघटना, समाज सेवक, संविधान प्रेमी, राजकीय कार्यकर्ते यांना एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.


सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५

**निमंत्रण आंदोलन**

मुख्यमंत्री
२ उपमुख्यमंत्री
३३ कॅबिनेट मंत्री
६ राज्यमंत्री
२८८ आमदार...

# सर्व जण वाशीमला याहो, शहर पाहा हो अन् विकास करा हो !

## * सागर कोकास यांचा आर्त टाहो...










## समस्यांच्या गर्तेत जीवन जगताहेत वाशिमकर

२८ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून रस्त्यांची स्वच्छता झाली, रस्त्यावरील खड्डे बुजविले. मात्र, गेल्या कित्येक वर्षांपासून वाशिम शहारातील प्रत्येक नागरिक दररोज याच खड्ड्यांतून ये-जा करतोय, त्यांची हाडे दररोज खिळखिळी होताहेत. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय दररोज वाशिम ला आल्यास किमान येथील जनतेला चांगल्या सुविधा तरी मिळतील, अशी माफक अपेक्षा आपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकास यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर तातपूर्ते का होईना आता निवडणुकीसाठी दिखावा म्हणून मुख्यरस्त्यावरील कामांना सुरूवात झाली आहे. मात्र, सागर कोकास यांच्या आंदोलनामुळेच हे कामे होत असल्याची चर्चा वाशीम शहराच्या मतदारामध्ये आहे.

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विकासाच्या नावावर हजारो कोटीचे कामे करूनही शहर भकास झाले आहे. नागरिकांना मुलभूत समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. शहरवासीयांना विविध समस्यांना तोंड घ्यावे लागत आहेत. शिवाय शहरातील रस्तेही १२ वर्षात ५ वेळा होवूनही रस्तेच नव्हे तर नागरिकांचे जीवनच खड्ड्यात गेले आहे. मुख्यमंत्री प्रचारासाठी आले असतांना शहरातील रस्ते तातपूर्ते का होईना रातोरात हातोहात दुरूस्त झाले. त्यामुळे मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो आमआदमी पार्टीचे उमेदवार सागर कोकास यांनी आंदोलन करून केला होते. या संबंधिचे सर्वप्रथम मुख्यमंत्री साहेब, तुमच्या मुळे तातपुरर्ते रस्ते दुरूस्त असे वृत्त लावून सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम लक्ष वेधले. सागर कोकासच्या आंदोलनाला यश आले असून सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्ताची दखल घेत मुख्यमंत्री गेल्यानंतरही शहरातील मुख्यमार्गाचे काम सुरू झाले होते. आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व आमदार, सर्व मंत्री यांना वाशीमला येण्याचे निमंत्रण सागर कोकास यांनी नागपूर अधिवेशनात जावून दिले आहे.




## 'सिटी न्युज सुपरफास्ट' चा सततचा पाठपुरावा...

**सर्व सामान्यांच्या समस्यांसाठी सांध्य दैनिक सिटी न्युज सुपरफास्ट शासन दखल घेईपर्यंत सततचा पाठपुरावा करीत असते. त्यामुळेच १३ वर्षात लोकांच्या मनामनातून घराघरात सिटी न्युज सुपरफास्ट पोहोचला आहे. शहरातील विविध समस्यांच्या प्रत्येक विषयांच्या हजारो वृत्त मालिकेची श्रृंखला सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरली आहे. शहरातील समस्यांसाठी सदैव प्रथम पुढाकार घेवून समस्या मार्गी लागेपर्यंत शेकडो वृत्तातून वृत्त मालिकेच्या माध्यमातून सततचा पाठपुरावा करीत असल्याने सिटी न्युज सुपरफास्टने जनसामान्यांच्या मनात घराघरात स्थान निर्माण केले आहे. त्याचाच परिणाम म्हणून समस्यांच्या वृत्तांच्या कात्रनाचे बॅनर शहरात आंदोलनाच्या वेळी लागत असतात.**

दि २८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून, प्रशासनाने नियोजित मार्गावरील खड्डे तासाभरात बुजविले, जागोजागी स्वच्छता केली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गेल्या कित्येक महिन्यांपासून असलेली समस्या १० मिनीटांत मार्गी लावली, ह्या सर्व बाबी पाहून आम आदमी पार्टीचे वाशिम नगर परिषद नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकास हे व्यथित झाले. त्यामुळे सागर कोकास यांनी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे पोस्टर हाती घेऊन, वाशिम करांना होणाऱ्या त्रासाची बाब अधोरेखीत केली. शहराच्या रस्त्याविषयी फक्त सिटी न्युज सुपरफास्टने शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली.

मुख्यमंत्री येणार त्या दिवशीच मुख्यमंत्री साहेब तातपूर्ती का होईना रस्ते दुरूस्त, प्रशासन सुस्त, नागरिक त्रस्त या आशयाचे वृत्त प्रकाशित केले होते. आणि विविध समस्यांची जाणीव करून दिली. त्यानंतर सागर कोकास यांनी रस्त्यावर उतरून अभिनोव आंदोलन केले. मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो काढला. त्यामुळे आता निवडणुकीच्या तोंडावर दिखावा म्हणून वाशीम शहरातील कामे तातपुर्ते का होईना सुरू झाले आहेत. पुसद नाका चौकातील काम, राजेंद्र प्रसाद शाळेमागील काम, बाकलीवाल शाळेसमोरील काम, अशा अनेक रस्त्याचे काम सागर कोकास यांच्या आंदोलनामुळे सुरू झाल्याची चर्चा आहे. मात्र पुन्हा शहरातील सर्वच रस्ते दुरूस्त करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना निमंत्रण देवून पुन्हा खड्ड्याच्या रस्त्यावर या तुम्हच्या मुळे का होईना रस्ते दुरूस्त होतील असे सागर कोकास यांनी आंदोलन केले. वाशिम नगर परिषद निवडणुकीच्या तोंडावर वाशिम शहराचा विकास प्रत्येक राजकीय पक्षांकडून केल्या जातो. मात्र, शहरात रस्त्यावर पडलेले खड्डे, सांडपाण्याचे व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, टेंपल गार्डनची झालेली दुरावस्था, रखडलेले नाट्यगृह, बंद असलेले पथदिवे, मुख्य शहरात रस्ता नाही, पण जिथे घर नाही अशा भागात सिमेंटचे रस्ते अशा एक नाही, अनेक समस्या वाशिम शहरात आ वासून उभ्या आहेत. २८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वाशिम शहरात आले होते. त्यांनी शहर विकासाची आश्वासने दिली. मात्र, वाशिमकर नागरिक दररोज कुठल्या परिस्थितीत जीवन जगतोय, याची त्यांना कल्पनाच नाही. त्यामुळे आम आदमी पार्टीचे वाशिम नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकस यांनी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे आवाहन करणारे पोस्टर दाखविले. कारण, गेल्या कित्येक वर्षांपासून रस्त्यावरील खड्डे जसेच्या तसेच आहेत, पिण्याचे पाणी वेळेवर मिळत नाही, जागोजागी कचऱ्याचे ढिग साचले, बंद अवस्थेत असलेले पथदिवे आदि समस्यांचा वाशिमकर दररोज सामना करीत आहेत. मात्र, मुख्यमंत्री शहरात येणार असल्यामुळे प्रशासनाने अगदी तासाभरात रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता तयार केला. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय रोज शहरात आले तर, वाशिमकरांना चांगल्या सुविधा तरी मिळतील, या अपेक्षेपोटी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे आवाहन केले. सागर कोकास यांच्या या आवाहनाच्या शहरातील प्रत्येक मतदाराच्या तोंडी चर्चा सुरू होती. त्यानंतर शहरातील रखडलेल्या कामाला सुरूवात झाली आहे .

### मुख्यमंत्र्यांसह, मंत्री व आमदारांना वाशीमला येण्याचे निमंत्रण...

मुख्यमंत्री साहेब तुम्ही, आमदार मंत्र्यांना घेवून माझ्या वाशिम रोज या वाशीम शहराचा विकास करा यासाठी निमंत्रण पत्रीका घेवून सागर कोकास हे विधानभवन नागपूर येथे गेले होते. वाशिम शहरातील रस्त्यांची झालेली अवस्था बदलण्यासाठी आज रोजी दि. १३/१२/२०२५ रोजी विधानभवन, नागपूर येथे १ मुख्यमंत्री, २ उपमुख्यमंत्री, ३३ कॅबिनेट मंत्री, ०६ राज्यमंत्री व २८८ आमदार यांना महाराष्ट्रातील सगळ्यात मागसलेल्या जिल्ह्यात म्हणजे आपल्या वाशिम ला आमंत्रित करीत आहोत. आपण माझ्या जिल्ह्यास भेट दिली तर संपूर्ण शासकीय यंत्रणा आम्हा वाशीमकरांना अगदी दोन तासात रस्ते, २ दिवसात शेत मालाला भाव, MIDC ला युवकांना रोजगार व रस्त्याच्या कडेला स्ट्रीट light लागतील ही अपेक्षा नसून आमचा आत्मविश्वास आहे. एक वाशीमकर आपणांस नम्र विनंती करतोय की कृपया फक्त एकदा माझ्या वाशिम ला या असे निमंत्रण सागर कोकास यांनी दिले आहे.




## होणार जीत, करणार चित...

# बाजी मारणार 'वंचित' !




## वैभव उलेमाले यांची प्रचारात आघाडी, इतरांची बिघाडी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

नगर पालिका निवडणूक पुढे ढकलल्याने १० दिवस निवडणुकीचे वातावरण थंड पडले होते. थंड वातावरणातही राजकारणाचे समिकरण बदलविण्यात व वातावरण गरम ठेवण्यात वंचितने प्रचारात आघाडी कायम ठेवली आहे. नगराध्यक्ष वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वैभव नितीन उलेमाले यांनी मतदारांना थेट भेटीतून संवाद साधत समस्या सोडविण्यासाठी प्राध्यान्य देत आहेत.

वाशीम शहरातील सर्वच राजकीय पक्षांच्या मातब्बर नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी कुटनीती धोरण अवलंबून विरोधकांना सत्तेपासून रोखण्यासाठी आटोकाठ प्रयत्न केला जात असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. त्यामुळे काही ठिकाणी वरून ' शह ' असला तरी आतून ' तह ' होण्याचे भाकीत राजकीय तज्ञ वर्तवित आहेत. मात्र तिसरी शक्ती म्हणून वंचित बहुजन आघाडी ताकदीनिशी रणांगणात उतरली आहे. त्यामुळे कोण होणार चीत, कोणाची होणार जीत यासाठी बाजी मारणार ' वंचित ' अशी चर्चा वाशीम शहरात होत आहे. २०१६ च्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार अत्यल्प मताने पराजीत झाला होता. त्याची शिवसेनेसोबत अतितटीची लढाई झाली होती. २०१६ च्या निवडणुकीच्या धर्तीवर जातीय समिकरणाच्या आधारे यावेळेसही २०१६ ची पुर्णवृत्ती झाल्यास शिवसेना आणि वंचितचीच खरी लढाई होवून वंचित बाजी मारणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

वंचित बहुजन आघाडीने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेत युती आणि आघाडीपुढे तगडे आव्हान उभे केले आहे. मागील निवडणुकीत मंगरूळपीर, कारंजा आणि मानोरा येथे निर्विवाद वर्चस्व स्थापित करणाऱ्या भारिपचा वाशिम नगर पालिकेत तब्बल ४७ टक्के मतं घेऊन निसटता पराभव झाला होता. तर रिसोड नगर परिषदेच्या निवडणुकीत तुल्यबळ लढत देत दुसरे स्थान मिळवले होते. तीच वंचित बहुजन आघाडी आजमितीस पूर्ण ताकदीनिशी रणांगणात उतरली आहे. त्यामुळे कोण होणार ' चीत ' आणि कोणाची होणार ' जीत ' यामध्ये बाजी मारणार वंचित असे अनेक राजकीय तज्ञ बोलत आहेत.



थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडून देण्याची ही दुसरी वेळ असली तरी राज्यातील दोन प्रमुख पक्षाचे चार पक्ष झाल्यानंतरची ही पहिलीच स्थानिक निवडणूक आहे. त्यामुळे स्थानिक स्तरावरील गट - तट, बंडखोरी आणि 'प्रभागनिहाय असलेल्या जातीय समीकरणावरही मोठ्या प्रमाणावर निकाल अवलंबून राहणार आहेत. त्यामुळे नगर सेवकपदासाठी अनेक प्रभागात हातात घड्याळ आणि मशालीत धनुष्यबाण घुसवून कमळ फुलविण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. म्हणून, वरून जरी शह वाटतं असला तरी आतून अनेक ठिकाणी तह होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. एमआयएम आणि अपक्ष किती प्रभाव पाडू शकतात हे निकालानंतरच कळणार आहे. मात्र नगराध्यक्ष पदासाठी बहुसंख्यांकांचे मतदान दोन ठिकाणी विभागले जाणार हे निर्विवाद सत्य आहे. तर दुसरीकडे सिलेंडरचे हक्काचे मतदान व अल्पसंख्यांकांची वोट बँक एकजुटीने चालल्यास ' वंचित'ला गृहीत धरणे महायुती आणि महाविकास आघाडीस महागात पडू शकते हे सुद्धा तितकेच खरे आहे. २०१६ ची पुर्णवृत्ती झाल्यास वंचितच बाजी मारणार असे दिसत आहे. वंचितचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार वैभव उलेमले यांनी प्रचारात आघाडी घेतली असून इतर पक्षाची अगोदरच बिघाडी झाली आहे. त्यामुळे आता सत्तेची घडी वंचितच्या हातातच जाणार आहे.

## माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे यांचा कृतज्ञता सोहळा



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे यांचा कृतज्ञता सोहळा ता १२ रोजी विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला.

या सोहळ्यास विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावून सुभाषराव ठाकरे यांच्य निरोगी दिर्घायुष्याची कामना केली. स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे यांच्या हस्ते स्वाभिमानी दिनदर्शिकेचे विमोचन करण्यात आले. दरम्यान, उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देऊन सुभाषराव ठाकरे यांच्या दिर्घायुष्याची कामना केली. जील्हाभरातून आलेले विविध क्षेत्रातील मान्यवर व कार्यकर्ते यांचे आभार मानत असल्याचे यावेळी ठाकरे यांनी सांगितले. कार्यक्रमाला वसंतराव पाटील शेगिकर, गुणवंतराव पाकधने, आत्माराम पाटील, शालिग्राम पाटील, नारायणराव बारड, चंद्रकांत ठाकरे, अशोकराव परळीकर, चंदूभाऊ परळीकर, सतीश बाहेती, दिलीपराव जाधव, जयकिशन राठोड, बबलु गावंडे, राम ठाकरे, आर के राठोड, भास्कर पाटील, चंद्रकांत पाकधने, पांडुरंग कोठाळे यांचेसह अधिकारी, कर्मचारी, विविध क्षेत्रातील मान्यवर सरपंच, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष व सदस्य तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषद सदस्य आर, के. राठोड यांनी केले तर संचालन प्रा. संजय कावरे यांनी केले.

# सिटी न्यूज सुपरफास्ट

शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com


# राष्ट्रवादी काँग्रेस व एमआयएम मध्ये चुरस राहणार....!

## प्रभाग क्र. 9

२०१७ च्या निवडणुकीनंतर पुला खालून बरेच पाणी वाहून गेल्याने या प्रभागाची स्थिती मात्र बदलत चालली आहे, या प्रभागात मागील दोन निवडणुकांमध्ये पती नंतर पत्नी यांना मतदारांनी नगरसेवक पदाची संधी दिली, तर शिवसेना तर्फे शशिकांत चोपडे या नव्या चेहऱ्याचा उदय झाला तर एम आय एम तर्फे मोहम्मद मुस्तफा यांनी मतदारसंघात चांगलीच बांधणी केली आहे, चारही नगरसेवकांची चार दिशेला तोंडे असल्याने या प्रभागाचा विकास मात्र खुंटल्याचे दिसून येत आहे. या प्रभागात भीम नगर, शांतीनगर, वानखडे नगर ,जोगळेकर प्लॉट, गुरुदेव नगर, गुलजारपुरा, ज्ञानेश्वर नगर, साईनाथ नगर, खैर मोहम्मद प्लॉट, सैलानी नगर, ताज नगर, शबनम नगर आदी परिसर येतो. भारतीय जनता पार्टीने सुद्धा या प्रभागात जोर लावण्याचा प्रयत्न केला परंतु २०१७ ला त्यांच्या चारही उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. परंतु यंदा भाजपाने सुद्धा या प्रभागात चांगलीच तयारी केली आहे. त्याचबरोबर वंचित बहुजन महासंघाने सुद्धा या प्रभागात विजय संपादन करण्यासाठी कंबर कसली आहे.



शितल गायकवाड | शितल रामटेके | शशिकांत चोपडे | मोहम्मद मुस्तफा

पक्के रस्ते, स्वच्छता, नाल्यांची देखभाल, पथदिवे यांसारख्या अगदी प्राथमिक स्वरूपाच्या सुविधाही आजपर्यंत मिळाल्या नाहीत. प्रभागाचा अर्धा भाग हा अल्पसंख्यांक, मागास वस्तीने व्यापलेला असून उर्वरित भाग डाबकी रोड परिसरातील मध्यमवर्गीय लोकवस्तीचा आहे. अल्पसंख्यांक व मागास वस्त्यांमध्ये रस्त्यांची स्थिती दयनीय आहे. नाल्या स्वच्छ होत नाहीत, नाल्या घाणीने तुडुंब भरलेल्या अवस्थेत असल्याने डासांची प्रचंड वाढ होते. नाल्यांच्या साफसफाईसाठी अनेकदा तक्रारी दिल्यानंतरही मनपा प्रशासन व लोकप्रतिनिधी प्रतिसाद देत नसल्याची भावना प्रभागातील नागरिकांची आहे. मतांचे विभाजन, चौरंगी लढती प्रभाग क्रमांक ९ मध्ये मोठ्या प्रमाणात मतविभाजन होत आले आहे. जातीय समीकणांमुळे या प्रभागात गेल्या मनपा निवडणुकीत चौरंगी लढती झाल्या होत्या.

या प्रभागात सर्वात जास्त अतिक्रमण भीम नगर चौक ते गडंकी कडे जाणाऱ्या रस्त्यावर पाहावयास मिळते या रस्त्यावर हिंदू स्मशानभूमी असल्याने अंत्ययात्रेला जाणाऱ्या नागरिकांना अतिक्रमणाचा त्रास सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर येथील बालकांच्या हिंदू स्मशान भूमीची दुरावस्था झाली आहे. अर्ध्याहून अधिक जागा अतिक्रमण धारकांनी गिळंकृत केली आहे. या स्मशान भूमी बाबत राजकीय पक्षांनी वारंवार आंदोलने सुद्धा केली आहेत. परंतु या हिंदू स्मशानभूमीच्या अतिक्रमण काढणे मुश्किल झाले आहे. भीम नगर चौक ते लोखंडी पुलाकडे जाणारा रस्ता सुद्धा चांगलाच उखडला आहे. या रस्त्यावर चिकन मटन व मासळी विक्रेत्यांनी अनेक दुकाने थाटून ठेवल्याने रस्त्याने ये जा करणाऱ्या लोकांना नाकावर हात ठेवूनच पुढे जाणे भाग पडत आहे. या परिसरातील अगरवेसची सुद्धा दुरावस्था झाली आहे. नदी किनाऱ्यावर राहणाऱ्या गुलजारपुरा परिसरातील नागरिकांना घाणीचा तसेच मच्छरांचा सामना करावा लागत आहे.





### प्रभागात ही कामे व्हावीत

सर्व रस्त्यांची दुरुस्ती व पुनर्बांधणी नाल्यांची स्वच्छता, नियमित कचरा उचलणे, अतिक्रमण विरोधी मोहीम, रस्त्यांवर पथदिवे बसवणे, रस्त्यांची दुरावस्था, नाल्यांची स्वच्छता नाही, कचऱ्याचे ढीग, अतिक्रमणाचा विळखा, पथदिव्यांचा अभाव, भुमिगत गटारची अवस्था बिकट असल्याचे चित्र आहे कायम आरोग्य धोक्यात सैलानी नगर, शांतीनगर, साईनगर, भिमनगर परिसरात कचऱ्याचे ढीग पाण्याचे मीटर बंद, बिले अवाजवी, महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा तीव्र नाराजी व्यक्त, नळांच्या मीटरची योग्य तपासणी न करता सरसकट हजारो रुपयांची पाणी बिले, ज्ञानेश्वर नगर, फडके नगर, वानखडे नगर, जोगळेकर प्लॉटमधील नागरिकांना हजारोंची बिले सार्वजनिक शौचालये, रस्त्यांची दुरुस्ती, नाल्यांचे बांधकाम तसेच शाळा दुरुस्ती कागदावरच दिसते.

अगरवेस ते कालीघाट पर्यंत जाणारा मुख्य रस्ता सिमेंट काँक्रीटचा बनला आहे या रस्त्यावर अनेक मूर्तिकारांचे कारखाने आहेत. या परिसरातील सर्विस गल्ल्यांची अतिशय दुरावस्था दिसून येत आहे सफाईचा अभाव असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेक ठिकाणी पथदिप बंद पडले आहेत या परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ नागरिक कचरा आणून टाकतात. त्यामुळे टाकी परिसराला कचराकुंडी चे स्वरूप प्राप्त झाले आहे, अर्ध्या परिसराचा विकास तर अर्धा परिसर संपूर्णपणे भकास दिसून येत आहे. त्यामुळे २०२५ च्या निवडणुकीत मतदार परत त्याच चेहऱ्यांना रिपीट करतात की नवीन सळसळत्या युवा कार्यकर्त्यांना संधी देतात. हे पाहणे योग्य ठरणार आहे अनेक नवीन होतकरू कार्यकर्ते यावेळी निवडणूक लढविण्याच्या तयारीत दिसून येत आहेत, शिवसेनेचे शशिकांत चोपडे यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे त्यामुळे उद्धव ठाकरे गटातर्फे कोण उभा राहतो त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.







प्रभाग क्रमांक ९ हा भीम नगर नावाने ओळखला जातो. हिंदू मुस्लिम बहुल मतदारसंघ असलेल्या या प्रभागाच्या निवडणुकीकडे सगळयांच्याच लक्ष राहते. तीस हजाराहून अधिक लोकसंख्या असलेल्या या प्रभागात नेहमीच जातीय मतदान पहावयास मिळते. २०१७ ला या प्रभागात पहिल्यांदाच एम आय एम ने खाते उघडून आपल्या पक्षाचा विस्तार करण्यास सुरुवात केली आहे. एमआयएमचा उदय झाल्याने या प्रभागात काँग्रेसची पीछेहाट झाली. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाने मात्र या प्रभागात आपले चांगलेच बस्तान बसविले आहे. त्या मानाने भाजपा सध्या या प्रभागात पिछाडीवर असल्याचे दिसून येत आहे. २०१७ ला झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत या प्रभागातून राष्ट्रवादीचे दोन, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा एक आणि एमआयएमच्या एका उमेदवाराने विजय प्राप्त केला होता.त्यामध्ये राष्ट्रवादीच्या शितल अजय रामटेके तसेच शितल मनोज गायकवाड या दोघी महिला उमेदवार तर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शशिकांत चोपडे व एमआयएमचे मोहम्मद मुस्तफा यांनी विजय संपादन केला होता. यंदा भीम नगर खैर मोहम्मद प्लॉट स्थित प्रभाग ९ मध्ये अ भागात अनुसूजित जातीसाठी जागा आरक्षित करण्यात आल्या आहे. तर ब भाग ओबीसी महिला अर्थात नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलेसाठी राखीव आहे. तर क भाग हा सर्वसाधारण महिलेसाठी अर्थात खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव आहे. तर ड भाग आहे सर्वसाधारण अर्थात खुला असून या ठिकाणी कोणीही उभे राहू शकते.

महानगरपालिकेच्या २०१७ साली झालेल्या निवडणुकीत प्रभाग नऊ मध्ये राष्ट्रवादीच्या दोन तर शिवसेना एक व एमआयएमच्या एका उमेदवाराचा विजय झाला होता. प्रभाग नऊ 'अ'मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या शीतल अजय रामटेके (मते ६०४३), 'ब'मध्ये शिवसेनेचे शशिकांत वामनराव चोपडे (४५५९), 'क'मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या शीतल मनोज गायकवाड (४०६२), व एमआयएमचे मोहम्मद मो. मुस्तफा मा. युसूफ (४०५२) 'ड'मध्ये विजयी झाले होते. दरम्यान, आगामी मनपा निवडणुकीसाठी अनेक जण या प्रभागातून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी सज्ज झाले आहेत. पथदिव्यांचा अभाव हा एक गंभीर प्रश्न असून रात्रीच्या वेळी काही भाग पूर्ण अंधारात असतात. चांगले रस्ते नाहीत, पावसाळ्यात पाणी घरांमध्ये शिरते, उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाई असते, नाल्यांची स्वच्छता होत नसल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

### एक नजर प्रभागावर :

रस्त्यांची दुरावस्था, नाल्यांची अस्वच्छता, पथदिव्यांचा अभाव, कचरा उघड्यावर, अतिक्रमण प्रचंड ?

प्रभागातील परिसर : गुलजारपूरा, अगरवेस, भिमनगर, नेहरूनगर, खैरे मोहम्मद प्लॉट, शांतीनगर, ताजनगर, ज्ञानेश्वर नगर, वानखडे नगर, जोगळेकर प्लॉट, साईनगर, शबनम्मा नगर, शरीफ नगर, गुरुदेव नगर, सैलानीनगर, समता विद्यालयाचा परिसर.

प्रभाग क्र ९ मधील आरआरसी चा **रणसंग्राम** हा कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा

# डाबकी रोड रूंदीकरणाचे भिजत घोंगडे कायम...!

## प्रभाग क्र. 10

प्रभाग दहा हा जुने शहरातील दाट वस्तीचा भाग असून, या प्रभागावर कायमच भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व राहिले आहे. प्रभागात गेल्या काही वर्षांत काँक्रीट रस्ते, पथदिव्यांची सोय झाल्याने नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत. मात्र, सर्वात ज्वलंत प्रश्न असलेल्या डाबकी रोड रुंदीकरणाचे वर्षभरापासून भिजत घोंगडे असल्याने नागरिकांना रोज समस्यांचा सामना करावा लागत आहे.

तसेच काही भागात नाल्याच अस्तित्वात नसल्याने नागरिकांच्या घरांभोवती घाण पाणी साचते. याशिवाय परिसरातील गोडबोले प्लॉट मधील व इतर उद्यानांची अवस्था बकाल झाल्याने नागरिक रोष व्यक्त करीत आहेत. शिवाजी नगर, डाबकी रोडच्या प्रभाग दहा मध्ये अ भाग आहे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला अर्थात ओबीसी महिलेसाठी राखीव आहे. तर ब भाग हा सर्वसाधारण महिलेसाठी राखीव आहे. तर प्रभाग दहा मधिल क आणि ड भाग हा सर्वसाधारण अर्थात खुल्या प्रवर्गासाठी राखीव आहे. डाबकी रोड रुंदीकरणाचा प्रश्न हा प्रभाग ९ आणि १० च्या सीमारेषेवर येतो. त्यामुळे दोन्ही प्रभागातील नगरसेवकांनी या प्रश्नासाठी पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. मात्र, तसे होताना दिसत नसल्याचे काही नागरिकांनी सांगितले. गेल्या काही महिन्यांपासून हा प्रश्न आहे तसाच कायम आहे.




गोडबोले प्लॉटमधील बगिच्याची तर अवस्था अत्यंत दयनीय आहे. शिवाय बगिच्यांमधील कचरा, घाणीमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रभागातील सर्वच भागात पाणीपुरवठा पाच दिवसाआड होत असल्याने नागरिकांना पाण्याची समस्या आहे. किमान तीन दिवसाआड तरी पाणीपुरवठा व्हावा अशी अपेक्षा नागरिकांची आहे. मूलभूत सुविधा सोडविण्यासाठी पुढाकार घेणारे व विकास कामांसाठी भांडणारे नगरसेवक आम्हाला हवेत अशी प्रतिक्रिया प्रभागातील नागरिकांनी दिल्या. रस्ते सिमेंट काँक्रीटचे झाल्याने मोठी समस्या दूर झाली आहे. प्रमुख रस्त्यांची कामे प्रलंबित होती. ती कामे गेल्या काही दिवसात पूर्ण झालीत. पाणीपुरवठा आता पाचव्या दिवसाआड आहे. त्या वेळापत्रकात बदल होऊन पाणीपुरवठा लवकर व्हावा असे वाटते. अतिक्रमण काढण्यासाठी डिसेंबर २०२४ मध्ये सुरुवात झाली होती. अजूनही अतिक्रमणामुळे काम पेंडिंग आहे. डाबकी रोडचे रुंदीकरण काम लवकर व्हावे अशी अपेक्षा नागरीकांची आहे.

### प्रभाग १० चा परिसर

काळामारोती मंदिर परिसर, जयहिंद चौक, गणपती गल्ली, मुंगसाजी महाराज मंदिर परिसर,शिवाजी नगर, शिवचरणपेठ, भारती प्लॉट, चिंतामणी नगर, रेणुका नगर, रमेश नगर, गणेश नगर, गोडबोले प्लॉट.

२०१७ च्या महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १० मध्ये भारतीय जनता पार्टीने मोठी ताकद दाखवत चार पैकी तीन उमेदवार निवडून आले होते. तर एका जागेवर शिवसेनेचा उमेदवार विजयी झाला होता. प्रभाग दहा 'अ'मध्ये भारतीय जनता पार्टीचे अनिल देविदास गरड (मते ५४२७), 'ब'मध्ये शिवसेनेच्या मंजूषा संजय शेळके (८०७७), 'क'मध्ये भारतीय जनता पार्टीच्या वैशाली विलास शेळके (६५२२), व 'ड'मध्ये भाजपचे सतीश गणेशराव ढगे (५३७५) विजयी झाले होते. दुरंगी व तिरंगी लढतीची शक्यता प्रमुख पक्षांमध्ये झालेले मतविभाजन हे भाजपच्या पथ्यावर पडल्याचे चित्र २०१७ च्या निवडणुकीत पहायला मिळाले होते. आगामी निवडणुकीतही हीच परिस्थिती कायम राहणार असल्याचे अनेकांचे मत आहे. उमेवारीसाठी आतापासून प्रमुख पक्षांमध्ये सुरु असलेली चढाओढ पाहता दुरंगी व तिरंगी लढती या प्रभागातून होतील, अशी शक्यता आहे.



अनिल गरड | सतिष ढगे | मंजुषा शेळके | वैशाली शेळके

### इच्छुक लागले कामाला

आगामी निवडणुकीसाठी अनेक जण या प्रभागातून नशिब आजमावण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. काही जणांनी बॅनरबाजी व सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचारही सुरु केला आहे. भाजपसह दोन्ही शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसचे तिकिट मिळविण्यासाठी अनेकांची धडपड वाढली आहे. मात्र, विद्यमानांपैकी काही नगरसेवकांनी चांगली विकास कामे करुन मतदारांवरील आपली छाप कायम ठेवली आहे. त्यामुळे बाहेरील उमेदवार मतदारांना कितपत आपल्या बाजूने करतील हेही पाहणे तितकेच महत्वाचे ठरणार आहे.पावसाळ्यात पाणी घरांमध्ये शिरते प्रभाग १० मधील काही भागांत नाल्या कायम कचरा, चिखल आणि दूषित पाण्याने भरलेल्या असतात. नाल्यांची नियमित साफसफाईच होत नसल्याने पावसाचे पाणी घरांमध्ये शिरत असल्याचे नागरिक सांगतात. जयहिंद चौक, शिवाजी नगर, शिवचरणपेठ हा भाग सखल असल्याने पावसाचे पाणी घरांमध्ये शिरते. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य त्या उपाययोजना राबवाव्यात अशी अपेक्षा नागरिकांची आहे.



### नागरी समस्या कायम

नाल्यांची अस्वच्छता व बांधकामे, काही भागात पथदिव्यांचा अभाव, कचरा उघड्यावर टाकण्याची समस्या कायम, प्रभागात डाबकी रोडचे रुंदीकरण, नाल्यांची मोठ्या प्रमाणात स्वच्छता, नियमित कचरा उचलणे, पाण्याच्या निचरा होण्यासाठी उपाययोजना, काँक्रीट रस्ते झाले, पण नाल्या नाहीत, परिसरातील उद्यानांची अवस्था झाली 'बकाल', गोडबोले प्लॉटमधील बगिचाची झालेली दुरवस्था, प्रभागातील विकास कामे लोकप्रतिनिधींनी मार्गी लावावी, रस्ते व नाल्यांची कामे प्रभागात समान पद्धतीने संपवावी, डाबकी रोडची पाणीपुरवठ्याची समस्या तत्काळ सुटावी याकडे लक्ष द्यावे लागेल.



कंत्राटदाराकडून राहिलेले अतिक्रमण कामात अडथळा येत असल्याचे सांगून हात वर केले जातात. काही जणांनी अतिक्रमण काढण्याच्या कामात खोडा घातल्याने रुंदीकरण थंडबस्त्यात आहे. हे काम तातडीने पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा डाबकीरोड वासीयांची आहे. प्रभागातील पथदिवे व रस्ते चकाचक झाले असले तरी आजही बऱ्याच समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत असल्याच्या प्रतिक्रिया आहेत. बहुतांश बगिचे हे भकास अवस्थेत असल्याने लहान मुले व ज्येष्ठांना बसण्या उठण्यासाठी जागा उरल्या नाहीत.







प्रभाग क्र १० मधील आरआरसी चा **रणसंग्राम** हा कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK